१८९१
म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र.

क्र. १७८ स १८९१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
पु० नाव - संगीत चिंतामणी
नाटक
ले - गोपाळ के. कानिटकर

१७८
सं क्र.

संगीत चिंतामणी.

नाटक

श्रीगजाननप्रसन्न.

# संगीत चिंतामणी नाटक.

हें पुस्तक

गोपाळ केशव कानिटकर

यांनीं रचून

शहर बडोदें येथें

"बडोदावत्सल" छापखान्यांत छापविलें.

शके १८१३; सन १८९१

किंमत आठ आणे ( कलदार )

SHET SHETYE, BOOK SELLER
MADHAVBAUG BOMBAY.

# प्रस्तावना.

## आर्या.

हरिहर सविता शक्ती; रामकथा कविजनीं कथन केल्या ॥
परि श्री गणेशलीला; नाटकारितिनें कधीं न श्रुत झाल्या ॥ १ ॥
हें जाणुनि संक्षेपें, रचिला हा ग्रंथ लोकहितकरसा ॥
प्रिय होवो आर्य जनां, वासंतीं सुखद चंद्र शितकरसा ॥ २ ॥
स्कंदपुराणीं आहे, महात्म्य श्रीगजाननाचें हो ॥
त्यांतिल रसिक कथा हे, नाटक रितिनें पसंत सुजनांहो ॥ ३ ॥
अल्पदिसांतचि रचिलें, हें नाटक मी बहू प्रसंगानें ॥
चिंतातुर निजदासा, साह्यकरी सिद्धिकांत अंगानें ॥ ३ ॥
द्यावा आश्रय सुजनीं, इहपर कल्याण समजुनि स्वमनीं ॥
गणपति महिमा सुंदर, सुखदायक तारिते सदा मनीं ॥ ५ ॥

# शुद्धिपत्रक.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | १ | ईजारे. | इजार. |
| १२ | १६ | शिख. | शिखि. |
| २३ | ६ | त्यांसही. | त्यांसहि. |
| ४२ | १८ | वर्ष. | वर्षे. |
| ४६ | १९ | थरिशि | धरिशि. |
| ५१ | ७ | वाट. | पाट. |
| ५८ | १५ | अभिजित. | गणासूर. |
| ६६ | १२ | मंगलवीर. | मग लक्ष वीर. |

नो ११३८
९८

श्री.

श्रीगजाननप्रसन्न.

# संगीत चिंतामणी नाटक.

## मंगलाचरण.

स्थळ—रंगभूमी.

पात्रें—सूत्रधार, संगीतवाले, नटी व विदूषक.

सूत्रधार—(संगीतवाल्यांसह रंगभूमीवर येऊन.)

शिखरिणी.

समर्था सिद्धीशा, निगम श्रुतिवंद्या जगपती ॥
विरंची श्री विष्णू, शशिधर तुझ्या सर्व विभुती ॥
अनंता अव्यक्ता, रुचिर मतिकांता गुणनिधी ॥
कृपादृष्टीं पाहें, त्वरित मज कारुण्य उदधी ॥ १ ॥

पद. (ख्याल.)

जगवंद्या हरि त्रिपुरारी, नमु भास्कर आदि कुमारी ॥
मजदिना, गौरिनंदना, तारि संसारीं ॥ १ ॥
आजवरी बहुत तारीले, ह्मणुनि हे चरण धरियले ॥
प्रऱ्हाद व्यास नारद, बहुत उद्धारिले ॥ २ ॥
हेरंबा विश्वकदंबा, प्रियकर तूं सुरपति सांबा ॥
पूजिती तुला अर्चिती, प्रभो मुळस्तंभा ॥ ३ ॥
धूम्रवर्ण श्री एकदंता, फरशांकुश धारि समर्था ॥
कलियुगीं, तुझे समजगीं, नाहिं फलदाता ॥ ४ ॥

# शुद्धिपत्रक.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | १ | ईजारे. | इजार. |
| १२ | १६ | शिख. | शिखि. |
| २३ | ३ | त्यांसही. | त्यांसहि. |
| ४२ | १८ | वर्ष. | वर्षें. |
| ४६ | १९ | थरिशि | धरिशि. |
| ५१ | ७ | वाट. | पाट. |
| ५८ | १५ | अभिजित. | गणासूर. |
| ६६ | १२ | मंगलवीर. | मग लक्ष वीर. |

नो ७६ न१९८

श्री.

श्रीगजाननप्रसन्न.

# संगीत चिंतामणी नाटक.

## मंगलाचरण,

स्थल—रंगभूमी.

पात्रें—सूत्रधार, संगीतवाले, नटी व विदूषक.

सूत्रधार—(संगीतवाल्यांसह रंगभूमीवर येऊन.)

शिखरिणी.

समर्था सिद्धीशा, निगम श्रुतिवंद्या जगपती ॥
विरंची श्री विष्णू, शशिधर तुझ्या सर्व विभुती ॥
अनंता अव्यक्ता, रुचिर मतिकांता गुणनिधी ॥
कृपादृष्टीं पाहें, त्वरित मज कारुण्य उदधी ॥ १ ॥

पद. (ख्याल.)

जगवंद्या हरि त्रिपुरारी, नमुं भास्कर आदि कुमारी ॥
मजदिना, गौरिनंदना, तारि संसारीं ॥ १ ॥
आजवरी बहुत तारिले, ह्मणुनि हे चरण धरियले ॥
प्रल्हाद व्यास नारद, बहुत उद्धरिले ॥ २ ॥
हेरंबा विश्वकदंबा, प्रियकर तूं सुरपति सांबा ॥
पूजिती तुला अर्चिती, प्रभो मुळस्तंभा ॥ ३ ॥
धूम्रवर्ण श्री एकदंता, फरशांकुश धारि समर्था ॥
कलियुगीं, तुझे समजगीं, नाहिं फलदाता ॥ ४ ॥

हे ईच्छा अंतःकरणीं, राहो मन तुझिये स्मरणीं ॥
लडिवाळ, बाळ गोपाळ, भाळ तव चरणीं ॥ ९ ॥

## पद. ( सरस्वतीचें. )

( मम स्तवना, देउनि माना, सभेसि यावें गजानना. या चा० )

तव चरणा स्मरुनि नमना करितों, दावीं शुभानना ॥ धृ० ॥
आदि शक्ति भगवती सरस्वति, द्यावें वरदाना ॥ तव० ॥ १ ॥
विधि हरिशंकर, उमा रमा सति, वर्णिति तुझे गुणां ॥ तव० ॥ २ ॥
गणेशलीला नाटक रितिनें, प्रिय हो या सुजना ॥ तव० ॥ ३ ॥
चिंतामणि अवतार प्रभूतो, धरुनी मारि गणा ॥ तव० ॥ ४ ॥
सुरस कथा परि, अरसिक कविहा करूं ईच्छित कवना ॥ तव० ॥ ५
केशव सुत, गोपाळ ह्मणतसे, मधुर करीं रसना ॥ तव० ॥ ६ ॥

( याप्रमाणें मंगलाचरण झाल्यानंतर—सभेकडे पाहून )

## साकी. ( चाल २ री. )

हर्ष अंतरीं, बहुत जहाला, आर्य जना पाहुनियां ॥
शृंगारादी नवरस दाऊनि, तोषवीन या ठाया ॥
हे प्रिय शशिवदनें ॥ येइं तूं रंगसभे ललनें ॥ १ ॥

( इतक्यांत नटी पुढील पदाच्या चालीवर नृत्य करीत येते )

## पद.

राग भूपकल्याण ताल धुमाळी.

( जय श्री रमणा भव भय हरणा० या चालीवर. )

श्रीगणपति हेरंब पदांबुज, स्मरतां निशिदिनिं सुख देती ॥
रंगभुमी, या, प्रिय, सुजनाला, होवो हे ईच्छा चित्तीं ॥ १ ॥

कालिदास, भवभूति, धनंजय, श्रीदंडी कविवर, सुमति ॥
श्री हर्षादी अनेक कविंची आर्यजनीं जाहली कीर्ती ॥ २ ॥
अल्पमती परी ईशकृपेनें, वर्णिन चरिता नाट्य रीती ॥
आहे प्राकृत गिरा दिनाची, मान्य असो हे मम विनती ॥ ३ ॥
परिसुनि वचना शिघ्र पातली, नृत्य करित हे कनक लता ॥
सुचिर रुचिर सौदामिनि जैशी, गौरवर्ण प्रियकर कांता ॥ ४ ॥
केशव सुत गोपाळ विनवितो, वंदुनि भावें सिद्धिपती ॥
रंगभुमी या प्रिय सुजनाला होवो हे ईच्छा चित्तीं ॥ ५ ॥

( याप्रमाणें नटी नृत्य करीत सभेंत येऊन. )

नटी—प्राणेश्वर चरणाप्रत वंदन करित्यें. महाराज.—

कामदावृत्त.

बाहिलें सभे, मजांशि कासया ॥ कां निमंत्रिलें बुध जनांसि या ॥
वदन चंद्रमा मुदित दिसतसे ॥ काय प्रियकरा अंतरीं असे ॥ १ ॥

सूत्रधार—

साकी. ( चाल २ री. )

संगित हरिलीला ही दाविन, धरुनि अशा हेतूला ॥
सत्कारुनियां सभे बाहिलें येथें या सुजनांला ॥
चिंता हेचि मनां ॥ तोषवुं कैसें आर्यजनां ॥ १ ॥

नटी—प्राणनाथ—

ठुंबरी. ( राग झिंजोटी ताल त्रिवट )

( झाली ज्याची उपवर दुहिता॰ या चालीवर. )

मान्यकरी जो स्त्री वचनाला ॥ निंदिति जन बहु त्या
पुरुषाला ॥ धृ० ॥ अनर्थकारक अबला बुद्धि ॥

समजुनि मानिति तुच्छ आह्मांला ॥ मान्य करि जो० ॥ १ ॥

म्हणून स्त्रियांचे अनुमतावर अवलंबून काय उपयोग ?

सूत्र०—हे प्रिये.—

आर्या.

धर्मार्थ काम मोक्षाहे ॥ स्त्री अनुमत्तेंचि होति सुखदाते ॥
कार्या कार्यी ललना ॥ तोषवि पुरुषा, अनेक सुखदा, ते ॥ १ ॥

कोणतेही सत्कार्यास, पत्नी अनुमोदनेंकरून प्रवृत्त झालें असतां यशःकर होतें.

नटी—हे प्रियकरा—

पद.

( राग भूपकल्याण ताल धुमाळी० )

सुज्ञ गुणी तुह्मीं प्रियकर माझे, करित्यें चरणीं या विनती ॥
नाटक लीला अखिल जनाला, मान्य असें सर्वहि जगतीं ॥ १ ॥
करुणा, विर, काठिण्य, भयंकर ॥ हास्य, शोक, अद्भुत रीती ॥
शृंगारादी नवरस दावुनी ॥ मेळविली कीर्ती बहुतीं ॥ २ ॥
तदन्याय यश प्राप्तीस्तव तुह्मीं ॥ आराधुनि तो सिद्धिपती ॥
आरंभावें कार्य आतां हें ॥ होउनियां निर्भय चित्तीं ॥ ३ ॥

परंतु प्राणनाथ आपण कोणता कथाभाग करून दाखविणार ?

सूत्रधार—हे सुंदरी.—

साकी. ( चाल दुसरी. )

चिंतामणि अवतार गणेशें, अवलंबुनियां दुसरा ॥
कपिल मुनीचें रक्षण करुनी मारियेलें गण असुरा ॥
लीला रसिक जनां, दाविन वंदुनि इश चरणा ॥१॥

नटी—फार उत्तम आहे मी अंतरगृहांत गमन करून नाटक पात्रांची सिद्धता ठेविते.

( असें ह्मणून नमस्कार करिते. )

पद.

( राग परज ताल त्रिवट. )

आहें शरण तुला, दिनबंधु, बंधु ॥ आहें० ॥ धृ० ॥
हे गणनायक, बुद्धि प्रकाशक, तारिं तारिं भवसिंधु, सिंधु ॥
आहें शरण० ॥ १ ॥
केशव सुत गोपाळ ह्मणतसे, पाय तुझे आह्मि वंदु, वंदु ॥
आहें शरण तुला० ॥ २ ॥

( या प्रमाणें गायन करीत अंतरगृहांत जाते )

सूत्र०—

पद.

( शुका सांग मज उखास्वयंवर० या चालीवर. )

श्री गणपति पद पंकज वंदुनी, वर्णिन तत्चरिता ॥
बुद्धि प्रकाशक तुजविण सदया, नाहिं आह्मां दाता ॥ धृ० ॥
सिद्धि बुद्धिच्या वरा प्रियकरा, सद्गुरु आदिनाथा ॥
तव मायेचा पार नसे कीं वेदहि शिणले गुणगातां ॥ १ ॥

( याप्रमाणें भजन करीत असतां एक विचित्र वेषधारी पुरुष नृत्य करीत येऊन उभा राहतो. )

विदू०— पद. ( ख्याल. )

माय गुड् फेलो, बडा अचंबा हुवा मुजे उस मजलसमे ॥
ख्याल तुरा कलगी कुच गाना, बडी बाहारी है उसमे ॥ धृ० ॥
भजन पुजन जब छोड दिया तब हुवा खुशी अपने मनमे ॥

धोति छोडके ईजारे पहेरी हजार लोकोंके बिचमें ॥
झूटी काया, झूटी माया, ख्याल करो कुच दुनियेमें ॥
ख्याल तुरा कलगी कुच गाभा, बडो बाहारी है उसमे ॥ १ ॥

सूत्र०—( ऐकून चकित होऊन. )

**श्लोक.**

( वसंततिलका. )

आलासि कोठुनि गड्या, आज या सभेला ? ॥
पाहूनियां तुजशिं, हर्ष मनासि झाला ॥
कोठें तुझें गृह ? व्यव्हारिक नाम काय ? ॥
सांगें किमर्थ आज भागविलेस पाय ? ॥ १ ॥

विदूषक—

**आर्या.**

नटि प्रेषित विदुषक मीं; आलों साह्यार्थ या सभास्थानीं ॥
हास्य रसा दावाया; सांगितलें मज तिनें, गृहस्थानीं ॥ १ ॥

सूत्रधार—हे विदूषका—या रंगभूमीवर मी संगीत चिंतामणी या नामें नाटक प्रदर्शित करणार आहें. ही कथा कोणत्या ग्रंथांत आहे ह्मणशील तर सांगतों ऐक.

**पद.**

( केशव करणी अघटित लीला० या चालीवर. )

स्कंद पुराणीं कथा सुरस हें ॥ अनुभवीक सुंदर ॥
सांगे तनया प्रति शंकर ॥ १ ॥
हरि सविता शक्ति माझीं हीं, चरितें अति सुंदर ॥
वर्णिती कविजन निरंतर ॥ २ ॥

या न्यायें श्रीगणेशलीला ॥ ऐक म्हणे प्रियकर ॥
सुजनां करिन तेचि जाहिर ॥ ३ ॥
भक्त संकटीं उडी घालितो ॥ कैसा जगदीश्वर ॥
सगुणरुप धरुनी अवनीवर ॥ ४ ॥

विदूषक--

पद.

( दो दिवसांची तनु हे साची०—या चालीवर. )

हल्लींच्या मन्मंतरिं पहातां, हिंदु नाटकें बहु करिती ॥
संगीताचा नवा रंग हा लाल जसा सुचिरावरती ॥ धृ०॥
नाटक ह्मणजे ईश्वरलीला, तीला सोडुन भलभलतीं ॥
बुकिश नाटकें करूं नये, या, परदेशी पाहुनि रीती ॥ १ ॥
नाटकवाले लोक इंग्रजी, फ्रेंच इटालीयन करिती ॥
शेक्सपिअरकृत बहू नाटकें, कल्पित या गोष्टी असती ॥ २ ॥
कसरतवाले चिनी जपानी, तसे इराणी गुजराथी ॥
जगदीश्वर वर्णनावांचुनी, व्यर्थ श्रम आर्यहि ह्मणती ॥ ३ ॥
स्वार्थ तसा परमार्थ साधण्या पूरातनची हे युक्ती ॥
संगीताचा नवा रंग हा लाल जसा सुचिरावरती ॥ ४ ॥

सूत्रधार—हे विदूषका कल्पितकादंबरी आदीकरून ग्रंथा प्रमाणें हें नाटक नाहीं. याचा कथाभाग प्रथम संक्षिप्त सांगतों ऐक.—

साकी ( चाल २ री. )

चिंतामणि हें रत्न दीधलें, ईंद्रें कपिल मुनीला ॥
ज्याच्या पूजनमात्रें ईच्छित होई प्राप्त समयाला ॥
ह्मणुनी मुनी हर्षें ॥ चालवी आश्रम बहु वर्षें ॥ १ ॥

ओवी.

द्रविड देशींचा अभिजित राणा ॥ त्या उदरीं नव्हतें पुत्र संताना ॥
तो शौनक वरप्रसादें जाणा ॥ सूत रत्ना पावला ॥ १ ॥
तो गणासूर अति विख्यात ॥ शिववरें जाहला उन्मत्त ॥
चिंतामणी कपिलाश्रमांत ॥ पाहूनि अन्याय आचरला ॥ २ ॥

आर्या.

मुनिवर करगत मणितो, करुनि बलात्कार गणनृपें हरिला ॥
या निज महापराधें, मूढपणें मृत्यु मूर्तिमान वरिला ॥ १ ॥
त्याचा नाश कराया, कपिलानें संकटीं गणेशाला ॥
आठवितां प्रभुवर तो, प्रघटुनियां मारि क्रुद्ध दैत्याला ॥ २ ॥
परिसुनि पुत्र वधातें, अभिजित चिंतामणीस घेऊन ॥
वंदि गजाननातें, तच्चरणीं त्या मणीस ठेऊन ॥ ३ ॥

साकी.

कपिल सुमुख चिंतामणी यापरि, गजाननांचीं नामें ॥
प्रसिद्ध झालीं अवतारींया, मान्य केलिं सुखधामें ॥
वर्णुनि तत्चरिता ॥ तोषवुं आर्यजनां आतां ॥ १ ॥

तस्मात् आतां द्रविड देशाचा राजा या सभेमध्यें येत आहे. हा पहा चोपदार इकडे ललकारत येत आहे. तरी आतां काय चमत्कार होईल तो स्वस्थपणें पहा.—

———

## प्रवेश १ ला.

स्थळ–द्राविडदेश, कांचनावती, राजमंदीर.

पात्रें–अभिजित राजा, ग्रंथ प्रधान, गुणवती, दासी, चोपदार.

**चोपदार**—शौर्य संपन्न गुणगंभीर भक्तिपरायण सत्वशील अभिजित महाराज.–

( याप्रमाणें पुढें चोपदार ललकारत आहे असा राजा प्रवेश करतो. )

**राजा अभिजित**—हे ग्रंथ प्रधानजी:–

ठुंबरी.

( राग झिंझोटी ताल त्रिवट. )

नाहिं जयाला पुत्र संतती, दाहि दिशा त्या शुन्यचि दिसती ॥ धृ० ॥
अप्रजजन त्यां मार्ग नसे कीं, स्वर्गलोक त्यां मिळण्या पुढतीं॥ ना.॥१॥
दान धर्म व्रत नियम सारिले; आस धरुनि तनयाची चित्तीं ॥ना.॥ २ ॥
साधु समागम, बहु सुखकारक , करितां मनिचे हेतू पुरती ॥ ना. ॥३॥

तस्मात अरण्यामध्यें जाण्याची सिद्धता करावी.

**प्रधान**—

साकी.

कर्मगती ही न चुके कवणा ॥ सुरनर ऋषि दैत्यांला ॥
समजुनी ऐसें, करु नये कीं; सूज्ञजनीं चिंतेला ॥
ऐके भूपाला; नकळे जगदीश्वर लीला ॥ १ ॥

**अभिजित**—

आर्या.

देती फल बहु दिवशीं, देव शिळा काष्ट मूर्ति त्या प्रणितां ॥
मज वाटे तात्काळचि, साधू करिती दया तयां नमितां ॥ १ ॥

### अभंग.

म्हणूनियां आजी जावया काननीं, निश्चय करुनि सिद्ध झालों ॥
साहा मास राज्यभार चालवावा, लोभ हा ठेवावा प्रजेवरी ॥ १ ॥

**प्रधान**—फार उत्तम आहे. वंदन करितों ( असें म्हणून निघून जातो आणि राणी प्राप्त होते. )

**राणी गुणवती**—प्राणनाथ नमस्कार करित्यें. माहाराज.—

### पद.

( वसंतसेना हरिणी सम या० या चालीवर )

मीही येत्यें आपुल्या संगे, हौस मला चित्तीं ॥
दया करुनि मजवरी प्रियकरा, मान्य करा विनती ॥ १ ॥
पुत्रावांचुनि व्यर्थ स्त्रिया ज्या, वंध्या जनिं म्हणती ॥
व्यर्थ जिणें जाहलें हे स्वामी, न कळे कर्मगती ॥ २ ॥
राज्य सौख्य हें न रुचे मजला, सत्याचि प्राणपती ॥
निपुत्रिकाचें शुन्य मंदिर, जन निंदा करिती ॥ ३ ॥
रात्रंदिवस ती हळहळ वाटे, चैन नसे मजप्रती ॥
दया करुनि मजवरी प्रियकरा, मान्य करा विनती ॥ ४ ॥

**अभिजित**—

### पद.

( दैव प्राधान्य उभयतांचे० या चालीवर )

व्यर्थ कां स्वमनीं तूं झुरशी,
हरिमायेची विचित्र लीला, न कळे त्या विधिशीं ॥
जावून घोर अरण्याशी,
सप्रेमानें दर्शन घेऊं, सेवुं विप्रतापशी ॥ चाल ॥
धरिला हेत असा ललने; आता तूं चाल हंसगमने ॥
मृगनयने मन्मथ सदने; म्हणुनी निमंत्रिलें तुजशी ॥
हरिमायेची विचित्र लीला न कळे त्या विधिशी ॥ १ ॥

मा. १७/२

राणी—फार उत्तम. प्राणनाथ विलास शाळेमध्यें आपण चलावें अशी विनंती आहे.

राजा—बरें आहे–चलावें. (असें म्हणून राणीसह राजा अभिजित निघून जातो.)

चोपदार—राज्याधीराज अभिजित राज माहाराज. (सर्व जतात.)

---

## प्रवेश २ रा.

स्थळ—अरण्य, शौनकऋषी, आश्रम.

पात्रें—अभिजितराजा; गुणवतीराणी, शौनकऋषी, शिष्य.

सूत्रधार—

श्लोक. (मालिनी.)

मग त्वरित रथीं तो भूप आरुढलाहो ॥
ह्मणति स्वजन तेव्हां ईश्वर लाभलाहो ॥
सकळहि मग तेव्हां सिद्ध सामुग्रि संगें ॥
भरुनि रथिं त्वरेनें पाठवी मंत्री अंगें ॥ १ ॥

श्लोक. (शिखरिणी)

समस्तांची आज्ञा, त्वरित मग घेऊनि निघती ॥
पथीं जातां लागे, वन बिकट घोरांदर अती ॥
थवे शार्दूलांचे, विचरति मृगेंद्रादिक महा ॥
अशा आरण्यातें, क्रमि नरपती निर्भय पहा ॥ १ ॥

### पद.

( वसंतसेना हरिणीसम या० या चालीवर. )

यापरि कानन, सोडुनि भूपति, प्रिय ललनें सहित ॥
चरण चालिनें अभिजित तेव्हां, मार्गे क्रमी अमित ॥ १ ॥
वनें उपवनें अनेक भ्रमतां, श्रमला नृपनाथ ॥
चालत हळु हळु गुणवति मागें, पदोपदीं बसत ॥ २ ॥
कंटक रुतती कोमल चरणीं, विव्हळ मनीं होत ॥
हास्य करी नृप पाहुनि तिजला काय तदां वदत ॥ ३ ॥
श्रमलिस मम जिवलगे शुभांगे, घोर अरण्यांत ॥
पहा पैल तो शौनक मुनिचा आश्रम विख्यात ॥ ४ ॥

राजा—

### पद.

( हिमालयाच्या घरच्या कुमरी हंसती० या चालीवर )

विविध उपवनें मलयज पवनें, डोलति फल दल कुसुमभरें ॥
कुसुमित बकुली, निबिड अलिकुली, रुणझुणती अनुदिनि निकरें ॥
हंस कोक बक शुक शिख मृग ते, उचलुनि निगदति मधुर स्वरें ॥
॥ विविध उपवनें० ॥ १ ॥

आणि.—

### श्लोक. ( चामर. )

आम्रवृक्ष, देवदार, ताडमाड जांबळी ॥
फनस, निंब, शेंवरी वकूल चिंच आंवळी ॥
उंबरी शिताफळी, अनेक वृक्ष शोभती ॥
पाहिं हे कुरंगलोचने, सखे वना प्रती ॥ १ ॥

याप्रमाणें हें शौनक ऋषीचें तपोवन आहे पैल आश्रमामध्यें शौनक महाराज वास करितात. तस्मात या ठिकाणीं क्षणभर विश्रांति घ्यावी.

राणी—

पद.

( रामचंद्र नाहिं धरी या चालीवर. )

चलाहो प्राणनाथ पाहुं त्या मुनीवरा ॥
उत्सव बहु आज भासे हर्ष अंतरा ॥ धृ० ॥
पुजन भजन करुनि त्यांशि प्राण प्रियकरा ॥
प्रार्थुनियां मागुं आपण ईच्छिलया वरा ॥
सूर्य ताप तीव्र होय जीव घाबरा ॥ चला० ॥ १ ॥

राजा—फार उत्तम आहे—चलावें मज समागमें.

सूत्रधार—

ओंवी.

मग पत्नीसह नृपनाथ, पातला शौनक आश्रमांत ॥
दर्शन होतां मुनिचें सत्य, हर्षें निर्भर जाहला ॥ १ ॥

साकी. ( चाल २ री. )

पाहुनि मुनिला लागुनि चरणीं , पूजित सोपस्कारें ॥
हस्त जोडुनि शौनक ऋषिते, विनवी बहूत प्रकारें ॥
पाहुनि उभयांला ॥ मुनिवर अंतरीं बहु द्रवला ॥ १ ॥

शौनक—

दिंडी.

पुत्र ईच्छा धरुनियां आश्रमा या, पातलासी वाटतें मला राया ॥
काय सांगें तव नाम कोण देश, पूर्ण हेतू तो करो रमाधीश ॥ १ ॥

पद.

( वसंतसेना हरिणीसम या॰ या चालीवर. )

यापरि कानन, सोडुनि भूपति, प्रिय ललनें सहित ॥
चरण चालिनें अभिजित तेव्हां, मार्ग क्रमी अमित ॥ १ ॥
वनें उपवनें अनेक भ्रमतां, श्रमला नृपनाथ ॥
चालत हळु हळु गुणवति मागें, पदोपदीं बसत ॥ २ ॥
कंटक रुतती कोमल चरणीं, विव्हळ मनीं होत ॥
हास्य करी नृप पाहुनि तिजला काय तदां वदत ॥ ३ ॥
श्रमलिस मम जिवलगे शुभांगे, घोर अरण्यांत ॥
पहा पैल तो शौनक मुनिचा आश्रम विख्यात ॥ ४ ॥

राजा—

पद.

( हिमालयाच्या घरच्या कुमरी हंसती॰ या चालीवर )

विविध उपवनें मलयज पवनें, डोलति फल दल कुसुमभरें ॥
कुसुमित बकुली, निबिड अलिकुली, रुणझुणती अनुदिनि निकरें ॥
हंस कोक बक शुक शिख मृग ते, उचलुनि निगदति मधुर स्वरें ॥
॥ विविध उपवनें॰ ॥ १ ॥

आणि.—

श्लोक. ( चामर. )

आम्रवृक्ष, देवदार, ताडमाड जांवळी ॥
फनस, निंब, शेंवरी बकूल चिंच आंवळी ॥
उंबरी शिताफळी, अनेक वृक्ष शोभती ॥
पाहिं हे कुरंगलोचने, सखे वना प्रती ॥ १ ॥

याप्रमाणें हें शौनक ऋषीचें तपोवन आहे पैल आश्रमामध्यें शौनक महाराज वास करितात. तस्मात या ठिकाणीं क्षणभर विश्रांति घ्यावी.

राणी—

पद.

( रामचंद्र नाहिं धरीं या चालीवर. )

चलाहो प्राणनाथ पाहुं त्या मुनीवरा ॥
उत्सव बहु आज भासे हर्ष अंतरा ॥ धृ० ॥
पुजन भजन करुनि त्यांशि प्राण प्रियकरा ॥
प्रार्थुनियां मागुं आपण ईच्छिलया वरा ॥
सूर्य ताप तीव्र होय जीव घाबरा ॥ चला० ॥ १ ॥

राजा—फार उत्तम आहे—चलावें मज समागमें.

सूत्रधार—

ओंवी.

मग पत्नीसह नृपनाथ, पातला शौनक आश्रमांत ॥
दर्शन होतां मुनिचें सत्य, हर्षें निर्भर जाहला ॥ १ ॥

साकी. ( चाल २ री. )

पाहुनि मुनिला लागुनि चरणीं , पूजित सोपस्कारें ॥
हस्त जोडुनि शौनक ऋषितें, विनवी बहूत प्रकारें ॥
पाहुनि उभयांला ॥ मुनिवर अंतरीं बहु द्रवला ॥ १ ॥

शौनक—

दिंडी.

पुत्र ईच्छा धरुनियां आश्रमा या, पातलाशी वाटतें मला राया ॥
काय सांगें तव नाम कोण देश, पूर्ण हेतू तो करो रमाधीश ॥ १ ॥

राजा—

आर्या.

संतति विहिन असें मीं, त्यायोगें नाहिं मार्ग मज नाकीं ॥
यास्तव वर प्रसादा, करिं मज देऊन धन्य या लोकीं ॥ १ ॥

शौनकऋषी—

पद.

( केशव करणी अघटितलीला० या चालीवर. )

सिंधु तटाकीं रम्य मनोहर, सर आहे उत्तम ॥
त्या स्थळीं करिं तूं व्रत नीयम ॥ १ ॥
जप होमादिक, भावें सर्वही, करीं तूं नृपसत्तम ॥
जेणें तोषे पुरुषोत्तम ॥ चाल ॥ २ ॥
साहित्य पुरवील तुजला गुणवति सती ॥
होईल गरोदर त्या पुण्यें निश्चिती ॥
जाईं मग संतोषें नगरा प्रती ॥
रक्षीं गोद्विज निजजन आपुले, पावशि तनयाला ॥
अभय वचन संतोषें दिधलें ऐकें भूपाळा ॥ १ ॥

राजा—

साकी.

जातो स्वामी सिंधु तटाकीं, तप करण्यास्तव आतां ॥
तंव आज्ञा वंदूनि मस्तकीं, सेविन त्या भगवंता ॥
दासा प्रती पावा, मजवरी लोभ असो द्यावा ॥ १ ॥

(या प्रमाणें विनंती करून राजा राणीसह सिंधुतिराप्रत गमन करितो)

## प्रवेश ३ रा.

**स्थळ.**—सरिता सागरसंगम, अरण्य.

**पात्रें.**—राजा अभिजित, गुणवती राणी, सरस्वती.

**राजा**—( सिंधुतिरावर पत्निसमवेत येऊन ).

### पद.

( काय बेध्या हरिणाचि मजा तरी पवन० या चालीवर )

पाहें सुंदरी, सिंधु तिरी या, सर रमणिय दिसतो ॥ पहा हा ॥ धृ० ॥
तट याचे बहू रम्य मनोहर, नानापरिचे येथें तरुवर, कुंद मालती केतकि सुंदर, मंद समिर वहातो, शितळ हा ॥ पाहें० ॥ १ ॥
झुळझुळ वाहे नीर सराचें, घेई दर्शन सरिता पतिचें, मंद डोलती तरु या वनिचे, पाहुनि जिव रमतो सुंदरी ॥ पाहे० ॥ २ ॥
आम्र बकुल हा फुलला चंपा, सुगंध वनिं दे मन अनुकंपा, पावे ज्यागृत करि कंदर्पा, तापातें हरितो सुंदरी ॥ पाहे सुंदरी० ॥ ३ ॥

( इतक्यांत सरस्वती त्या अरण्यांत पुष्पें वेंचित आहे तें पाहून ).

**गुणवती**—

### पद.

( अरुणापरि त्या गहन चमकती० या चालीवर. )

कनक लता कीं सौदामिनि हे, नभ मंडळ सोडुनी ॥
आलि कशीं चुकली काय काननीं ॥ १ ॥
दिसे मुग्धपरी, मन मोहित करी, मजकडे अवलोकुनी ॥
धन्य हे चंचल मृगलोचनी ॥ २ ॥

गौरवर्ण आरक्त ओंठ हे, मुक्त घोंस श्रवणीं ॥
झळके नाशिकीं नथ हिरकणी ॥ ३ ॥
शुभ्र वसन कंचुकी गोमटी, कंठीं मंगळमणी ॥
हार मोत्यांचे जडित कोंदणीं ॥ ४ ॥
जाइ जुई फुल जाळि मस्तकीं, वेणी भुजंगापरि ॥
राखडी मुद झळके साजिरी ॥ ५ ॥
बाजुबंद पाटल्या अमोलिक, दिव्य कंकणें करीं ॥
झळके मुद्रा दश अंगुळीं ॥ ६ ॥
बहु नाजुक हे कोमल अंगा पद ठेवित मेदिनीं ॥
फिरे हे चपल हंस गामिनी ॥ ७ ॥
गुछ फुलांचे, करीं घेऊनी, साशंकित होउनी ॥
विलोकित आलि पहा या वनीं ॥ ८ ॥

( इतक्यांत सरस्वती येते. )

सरस्वती—

ठुंबरी

(झाली ज्याची उपवर दुहिता० याचालीवर)

कां आक्रमिलें काननवासा ॥ कोण कोठिल तूं सांग नरेशा ॥ धृ० ॥
सुंदर कांता घेउनि संगें; भ्रमशीं त्यजुनी सौख्यविलासा ॥ कां० ॥१॥

राजा— हे देवी. यादेहाला अभिजित याप्रमाणें ह्मणतात, माझी ही पत्नी गुणवती. मी द्राविड देशाचा राजा आहे. येथें येण्याचें कारण,

साकी. ( चाल २ री. )

नाहिं पुत्र संतती ह्मणुनियां राज्य त्यजुनि या स्थानीं ॥
तप करण्यास्तव आज्ञा दिधली, आह्मां शौनक मुनिनीं ॥
राहुनि या ठायां ॥ झिजवूं हे आपुली काया ॥ १ ॥

परंतु हे देवी आपलें नांव काय हें ऐकण्याची इच्छा आहे.

सरस्वती—

दिंडी.

ब्रह्मतनया मी, शारदा नाम सत्य॥
पुष्प सामुग्री घ्यावया या वनांत ॥
नित्य येतें मीं पैल तात माझा ॥
तपश्चर्या करितसे आत्म काजा ॥ १ ॥

राणी—

कामदावृत्त.

धन्य दिवस हा, आजि वाटला ॥ दर्शनें मना हर्ष जाहला ॥
संगती तुझी इच्छितें मनीं ॥ घालवूं सुखें काळ या वनीं ॥ १ ॥

सरस्वती—

साकी.

स्वस्थ असावें आतां वनीं या, हे गुणवति नृपवनिते ॥
पुष्पं घेण्या नित्य निरंतर, यावें मज सांगातें ॥
पाहुनियां तुजला, सखये हर्ष मनीं झाला ॥ १ ॥

( याप्रमाणें बोलून गमन करिते )

राजा—हे प्रिय आतां या अरण्यामध्यें आपल्याला रहावयाचें आहे. येथें आश्रम बांधण्यास हें स्थळ किती रमणीय आहे पहा.—

कटाव.

पुष्ट वाटिका रम्य मनोहर, दीर्घ केतकी शोभे सुंदर ॥
चमेल चंपा जुई शेंवती ॥ गोकर्णादी अनेक फुलती ॥
गगन चुंबित तरु हे दिसती ॥ मल्लीकाच्या लांब वल्लिका ॥
मधूमालती फुलल्या कलिका ॥ पहा वनपशु कसे धांवती ॥
अली कुलांचे वृंद हिंडती ॥ पक्क फळातें पक्षि भक्षिती ॥
मंद मारुतें वृक्ष डुल्लती ॥ बांधुनियां आश्रम कांते ॥
या स्थळीं रहाण्या गमतें ॥

( याप्रमाणें बोलत राजा राणीसह गमन करितो. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ.—अरण्य- तपोवन.

पात्रें—ब्रह्मदेव, सरस्वती.

सूत्रधार—

पद.

( वसंतसेना हरिणी० या चालीवर. )

भूलोकीं या, सुरनर किन्नर, जन्म सदा वांछिती ॥
अल्प तपानें हरिपद प्राप्ती, होय तयां निश्चिती ॥ १ ॥
जाणुनि अंतरिं, येइ वनांतरीं, विधि तो एकांतीं ॥
उत्तम गंगा सागर संगम, पुण्य भुमी ह्मणती ॥ २ ॥

( इतक्यांत ब्रह्मदेव रंगभूमीवर येऊन आसनारूढ होतो. )

ब्रम्ह०—

श्लोक. ( शिखरिणी. )

अहा तूझी लीला, अघटित प्रभो विश्वजनका ॥
नसे देवा कोणी, तुजविण अह्मां जिवलग सखा ॥
हरे रामा कृष्णा, कमलनयना गोपिरमणा ॥
रमाकांता पावें, झडकरि मला, सिंहवदना ॥ १ ॥

( या प्रमाणें ह्मणून ध्यानस्थ होतो इतक्यांत स्वरस्वती प्राप्त होते. )

सूत्र०—

पद.

( वसंतसेना हरिणीसम० या चालीवर. )

होमद्रव्य आणि पुष्पें समिधा, घेऊनियां स्वकरीं ॥
आलि वनांतुनी, ते मृगनयनी, कमलासन कुमरी ॥ १ ॥
वंदन करि परि निमग्न स्वपिता, ध्यानिं आणिला हरी ॥
जाणुनि अंतरीं, मग ते सुंदरि, बैसे अंकावरी ॥ २ ॥
भुजंग वेणी सरळ नासिका, ओंठ पोंवळ्यापरी ॥
मुक्तहार वक्षस्थळिं शोभे, दिव्य कंकणें करीं ॥ ३ ॥
शुभ्रवसन तें शुभ्रकंचुकी, झळकतसे भरजरी ॥
चंचल नयनी गौरवर्ण ते शोभे मदन मंजिरी ॥ ४ ॥
पायांत पैंजण, बाजति रुमझुम, कोमल वपु साजिरी ॥
अंगसुवासें, भ्रमर वेधले, पक्षि गाति सुस्वरीं ॥ ५ ॥
वसंत मन्मथ, सहपरिवारें, प्रगट होति त्यास्थळीं ॥
डोलति तरुवर कुसुमभरानें, जाइ जुई फूलली ॥ ६ ॥
तटस्थ झाले, द्विज मृग वानिंचे, वनदेवी शोभली ॥
पाहुनि स्वरुपा, रतिपति, मधुपा, हे संधी साधली ॥ ७ ॥

अंगलग्न होतांचि स्त्रियेचें, संचरला अंतरीं ॥
आलि वनांतुनि, ते मृगनयनी, कमलासन कुमरी ॥ ८ ॥

( ब्रह्मदेव ध्यानस्थ आहे असें पाहून सरस्वती अंकावर बसते. )

सूत्र०—

श्लोक. ( चामरा. )

अंकि बैसतांचि, दिव्य भूषिता सरस्वती ॥
प्रेषि काम तीव्र बाण, अंतरांत निश्चिती ॥
बोले शारदेसि इंदु मंडलानने तुला ॥
पाहतां नदीपतीच हा मनिं प्रमोदला ॥ १ ॥

( याप्रमाणें ब्रह्मदेव त्या अंकस्थित सरस्वतीला आलिंगन देऊन चुंबन घेता, तेव्हां सरस्वती चकित होऊन दूर उभी राहते. )

सरस्वती—

पद.

( मैने धुंडा जगतमों सारा, मुझे छांड चला बणझारा० या चालीवर. )

हे देवा पार्वति कांता, संकटीं रक्षि अनाथा ॥
तुजवांचुनि मजला त्राता, नाहि इथें प्रभो भगवंता ॥ चाल ॥
न दिसे कांहीं ऊपाय, चकित मन होय,
करूं गत काय ? जाऊं कोणा शरण मीं आतां ॥ संकटीं० ॥ १ ॥

( असें ह्मणून दूर होते तेव्हां ब्रह्मदेव—काम बाणानें धुंद नेत्र झालेला उभा राहून— )

ब्रह्मदेव—

पद.

( अष्टमूर्ती परमेश० या चालीवर. )

त्यजुनि समाधि, सखे सुंदरी, हर्ष मना जहाला ॥
सुचिर रुचिर, शशिवदन मनोहर, पाहुनि जिव रमला ॥
॥ त्यजुनि० ॥ धृ ० ॥
गौरवर्ण मृदुअंग जहालों दंग पाहुनि स्वरुपा ॥
दे मुखचुंबन आतां सुंदरी, शांत करी तापा ॥
कामज्वरानें पीडित तनुहे, पावलि अनुकंपा ॥
चाल अतां एकांत स्थळीं तूं रति सुख दे मजला ॥
सुचिर रुचिर शशिवदन मनोहर, पाहुनि जिव रमला ॥ १ ॥

सरस्वती—( या प्रमाणें पित्याचें भाषण ऐकून. )

पद.

( पत्र दीधलें द्विजवरें करीं० या चालीवर. )

जाहली कशी, भ्रमित हे मती ॥ ऐक तात, या जगांत, थोर अमित, भ्रमति व्यर्थ, विषय वांछिती ॥ दुष्ट कामहा, नष्ट निश्चिती ॥ पूर्व कर्म, जाणुनि वर्म, निंद्य परम, हा अधर्म, वेद बोलती ॥ १ ॥ शचिपती भगांकित जाहला ॥ कलंक युक्त, चंद्र होत, विष्णु भ्रमित होउनि करित, स्मशान आसरा ॥ २ ॥ हाचि मन्मथ, त्रासि शंकरा ॥ मोहुनि नेत, ऋषि स्त्रियांत, करित नृत्य, स्कंद तात, होय बावरा ॥ ३ ॥ नग्न होउनी, गायना करी ॥ विप्र कोपुन, वदति कठिण, शाप वचन, लिंग पतन, होवो झडकरी ॥ ४ ॥ ज्योतिर्लिंग त्या ह्मणति भूवरी ॥ हा अनंग, अति निसंग, करित रंग, सुरत संग, पाहि हे रिती ॥ ५ ॥

ब्रह्मदेव—हे मृगलोचने—

पद.

राग खमाज ताल रूप.

(रमाकांत नये० या चालीवर.)

देइं तूं हृदय संग, हा अनंग, जाळि मला, जाळि मला गे ॥ धृ० ॥
विषयसुखासाठिं कसे, झाले हरी शंभु पिसें ॥
समज मनीं सर्व तसें, व्यर्थ असे, भ्रम हा तुला गे ॥ देइं तूं० ॥ १ ॥
तीक्ष्ण तव नयन बाण, व्याकुळ बहु होति प्राण ॥
मधुर तुझें अधरपान, सुखद मला, सुखद मला गे ॥ देइं तूं० ॥ २ ॥
मति माझी भ्रमलि आज, न सुचे मज अन्य काज ॥
भ्रमर जसा लुब्ध होय, कमलफुला, कमलफुला गे ॥ देइं० ॥ ३ ॥

(असें ह्मणून तिचे जवळ जाऊन तिचा हात धरतो, तो झिडकारून.)

सरस्वती—

कामदावृत्त.

सिद्धमुनि तुह्मां वर्णिती सदां ॥ सुरनरादिही वंदिती पदां ॥
सत्यलोकिंचे अधिपति जरी ॥ वागती असे अनर्थ हा तरी ॥

हे पित्या आपल्या दुराचरणाचे योगानें सिद्धमुनी ऋषेश्वर देव नरादिक काय ह्मणतील? विनाश कालसमयीं विपरित बुद्धीला अनुसरल्यानें अनेक सिद्ध, ज्ञानी पुरुष देखील अपकीर्तिला पात्र होऊन शेवटीं नाशाप्रत पावले. याचा विचार करून या दुष्ट वासनेचा त्याग करावा; नाहींतर ही गोष्ट मी सर्व देव-ऋषींला निवेदन करीन.

ब्रह्मदेव—

पद.

( रामासि अनुकूल असति त्यांचें० या चालीवर )

होईल साह्य जरी वज्रधर, तरि आज दूर्धर करिन मीं समर ॥ १ ॥
मारीन बृहस्पती वरुणाला, रगडीन त्याहि कृतांत यमाला ॥ २ ॥
येतील सन्मूख जरी शीव हरी, जिंकीन त्यांहि यूद्धिं निर्धारी ॥ ३॥
माझा काम अग्नि प्रदिप्त जाहला, भोगीन येकदां सुंदरि तुजला॥४॥

( याप्रमाणें ब्रह्मदेव बोलून सरस्वतीला धरण्यास जातो तेव्हां एकाएकी अडखळून भूमिवर मूर्छित पडतो. )

सरस्वती—हर हर परमेश्वरा ! !—

पद.

राग गौडी ताल भजनी.

( एडका मदन, तो केवळ पंचानन० या चालीवर )

आतां मीं जातें आतां मीं जातें, सांगण्या वृत इंद्रातें ॥ धृ० ॥
हा ब्रह्मदेव जगकर्ता, नाम स्मरणें संकट हर्ता ॥
परि अन्यायें करि अनर्था, नवल मज होतें ॥ सांगण्या० ॥ १ ॥
जळो हा काम नष्ट चांडाळ, यानें मोहिलें जग हें सकळ ॥
ब्रह्मांडीं या अजिंक प्रबळ, रमाकांता तें ॥ सांगण्या० ॥ २ ॥

( याप्रमाणें ह्मणून सरस्वती ब्रह्मदेवास मूर्छित पाहून स्वर्गलोकीं गमन करते. नंतर )

ब्रह्मदेव—( मूर्छा सांवरून उभा राहतो आणि सरस्वतीचा शोध करीत:—)

कटाव.

ज्ञान दृष्टिनें वृतांत कळला, त्यागुनि गेली सुंदरी मजला ॥ अमरपुरीचा मार्ग धरुनी, निघे तेथुनी ॥ धुंद लोचनीं असुनी ज्ञानी, बोले वाणी, काम पेटला, जाळा मजला ॥ अनर्थ जाहला, येई प्रिये दे सुख संगाला ॥ देउनि विझवीं कामाग्निला, भोगाया सुंदरि तुजला, येतों मीं अमर सभेला ॥ १ ॥

( याप्रमाणें बोलत ब्रह्मदेव अमरलोकीं गमन करितो. )

---

## प्रवेश ५ वा.

---

स्थळ—स्वर्गलोक, इंद्रसभा—

पात्रें—इंद्र, ब्रहस्पती, वरूण, यम, रंभा, शची, देवांगना, सरस्वती, ब्रह्मदेव, चोपदार,

सूत्रधार—

पद.

( राग काफी ताल त्रिवट. )

( कोण सुशीला प्रसवली तुजला० या चालीवर )

स्वर्ग लोकांपुढे, तुच्छ आह्मां वाटे सप्तद्वीपा वसुंधरा हो ॥ १ ॥
नाहीं तेथें दुःख दारिद्र कोणाशि दीर्घायुषी सूरवर ॥ २ ॥
चिंतामणी खडे पाषाण तेथिंचे, कल्पतरू दिव्य शोभा ॥ ३ ॥
कामधेनु मनीं इछिलें पुरविती, नाहिं तेथें द्वैत लोभा ॥ ४ ॥

अमरपूरीं राजा, दशशत नयन, सिंव्हासनीं शोभे इंद्र ॥ ५ ॥
वामभागीं शची बैसे अंकावरी, पोर्णिमेचा जैसा चंद्र ॥ ६ ॥
सव्यभागीं बृहस्पती महाराज, वंदिती सुरमुनेश्वर हो ॥ ७ ॥
वरुण उदकपति, सप्तकर वायू, यक्षपती कूबेर ॥ ८ ॥
कालदंडधारी धर्मराज यम, सरितापती सागर ॥ ९ ॥
गंधर्व किन्नर गाति मधुर स्वरें, सभा तेथें घन दाट हो ॥ १० ॥
देवांगना अंकीं, घेउनि सुंदर. पुण्यवंत सुख भोगहो ॥ ११ ॥
वांछीति ते या, अमरपुरा येती, साधुनी सत्कीर्ति योगहो ॥ १२ ॥
दिव्य देहीं सर्व, दिव्य कालमान. नाहीं जरा व्याधी रोगहो ॥१३॥
काम क्रोध रिपू शरण तयां प्रती, पूर्ण ज्ञानी माहाराज हो ॥ १४॥
ऐशा सभेमाजी, रंभा तीलोत्तमा नृत्यांगना गाति छंद हो ॥ १५ ॥

(याप्रमाणें ईंद्रराजा सभास्थानीं सिंव्हासनारूढ असतांना सरस्वती अमरावतीस येते.)

सरस्वती— पद.

(आजि अक्रूर हा नेतो श्री कृष्णाला०या चालीवर)

या अमरसभे कळवीन वृत्त ईंद्राला ॥
सुरगुरू लोकपालांला ॥ १ ॥
काय सांगु इथें देवाशी विपरित वार्ता ॥
अति निंद्य गोष्ट हे पहातां ॥ २ ॥
धावें पावें प्रभो, जगदीशा लक्षुमिकांता ॥
संकटीं राक्षि अनाथा ॥ ३ ॥ चाल ॥
हा काम नव्हे चांडाळ ॥
याचे तीक्ष्ण अति शरजाळ ॥
भ्रमविले देव ऋषि सकळ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

कटाव.

ज्ञान दृष्टिनें वृतांत कळला, त्यागुनि गेली सुंदरी मजला ॥ अमरपुरीचा मार्ग धरुनी, निघे तेथुनी ॥ धुंद लोचनीं असुनी ज्ञानी, बोले वाणी, काम पेटला, जाळी मजला ॥ अनर्थ जाहला, येई प्रिये दे सुख संगाला ॥ देउनि विझवीं कामाग्निला, भोगाया सुंदरि तुजला, येतों मीं अमर सभेला ॥ १ ॥

( याप्रमाणें बोलत ब्रह्मदेव अमरलोकीं गमन करितो. )

---

## प्रवेश ५ वा.

---

स्थळ—स्वर्गलोक, इंद्रसभा—

पात्रें—इंद्र, ब्रहस्पती, वरूण, यम, रंभा, शची, देवांगना, सरस्वती, ब्रह्मदेव, चोपदार,

सूत्रधार—

पद.

( राग काफी ताल त्रिवट. )

( कोण सुशीला प्रसवली तुजला० या चालीवर )

स्वर्ग लोकांपुढे, तुच्छ आह्मां वाटे सप्तद्वीपा वसुंधरा हो ॥ १ ॥
नाहीं तेथें दुःख दारिद्र कोणाशि दीर्घायुषी सूरवर ॥ २ ॥
चिंतामणी खडे पाषाण तेथिंचे, कल्पतरू दिव्य शोभा ॥ ३ ॥
कामधेनु मनीं इच्छिलें पुरविती, नाहिं तेथें द्वैत लोभा ॥ ४ ॥

अमरपूरीं राजा, दशशत नयन, सिंव्हासनीं शोभे इंद्र ॥ ५ ॥
वामभागीं शची बैसे अंकावरी, पोर्णिमेचा जैसा चंद्र ॥ ६ ॥
सव्यभागीं बृहस्पती महाराज, वंदिती सुरमुनेश्वर हो ॥ ७ ॥
वरुण उदकपति, सप्तकर वायू, यक्षपती कूबेर ॥ ८ ॥
कालदंडधारी धर्मराज यम, सरितापती सागर ॥ ९ ॥
गंधर्व किन्नर गाति मधुर स्वरें, सभा तेथें घन दाट हो ॥ १० ॥
देवांगना अंकीं, घेउनि सुंदर. पुण्यवंत सुख भोगहो ॥ ११ ॥
वांछीति ते या, अमरपुरा येती, साधुनी सत्कीर्ति योगहो ॥ १२ ॥
दिव्य देहीं सर्व, दिव्य कालमान. नाहीं जरा व्याधी रोगहो ॥१३॥
काम क्रोध रिपू शरण तयां प्रती, पूर्ण ज्ञानी माहाराज हो ॥ १४॥
ऐशा सभेमाजी, रंभा तीलोत्तमा नृत्यांगना गाति छंद हो ॥ १५ ॥

(याप्रमाणें ईंद्रराजा सभास्थानीं सिंव्हासनारूढ असतांना सरस्वती अमरावतीस येते.)

सरस्वती— पद.

(आजि अक्रूर हा नेतो श्री कृष्णाला०या चालीवर)

या अमरसभे कळवीन वृत्त ईंद्राला ॥
सुरगुरू लोकपालांला ॥ १ ॥
काय सांगु इथें देवाशी विपरित वार्ता ॥
अति निंद्य गोष्ट हे पहातां ॥ २ ॥
धावें पावें प्रभो, जगदीशा लक्षुमिकांता ॥
संकटीं राक्षि अनाथा ॥ ३ ॥ चाल ॥
हा काम नव्हे चांडाळ ॥
याचे तीक्ष्ण अति शरजाळ ॥
भ्रमाविले देव ऋषि सकळ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

जाणुनि अंतरीं हें शरण तुझे पद कमळा ॥
संकटीं राक्षिं दासीला ॥ या अमरसभे० ॥
( या प्रमाणें ह्मणून सरस्वती ईंद्रसभेमध्यें प्रवेश करित्ये )
**चोपदार**—राज्याधिराज त्रैलोक्यनाथ देवेंद्रराज माहाराज.

सर०— **पद.**

( रामचंद्र नाहिं घरीं० या चालीवर. )

राक्षि राक्षि अमरनाथ फार त्रासल्यें ॥
मृत्यु लोकाहुनिया, सभेस पातल्यें ॥ धृ ॥
अवनिवरी सिंधु तिरीं तपगहन ॥
करित होते, तात माझे चतुरानन ॥
काय करूं कर्मगती, परम गहन ॥
सहजरिती अंकावरि जाउन बसल्यें ॥ मृत्यु० ॥ १ ॥
अंकिं बैसतांचि ध्यान त्यजुनियां मला ॥
पाहुनियां पंचशरें मोह पावला ॥
ह्मणे सुदती, वीश्वपती भोग दे मला ॥
ऐकुनियां वचन असें चकित जाहल्यें ॥ मृत्यु० ॥ २ ॥

( या प्रमाणें सरस्वती, वर्तमान सांगत आहे इतक्यांत ब्रह्मदेव त्या सभेमध्यें धुंद आरक्त नेत्र झालेला असा येऊन— )

ब्रह्मदेव— **पद.**

(आतां किति तरि करूं मनधरणी० या चालीवर. )

तुझें अधरपान बहुगोड गोड, पुर पुरवि प्रिये तूं मनिचें कोड ॥ धृ० ॥
कां त्यागुनि आलीस मला तूं, हट्ट मनींचा सोड ॥ तुझें० ॥ १ ॥

( कामांध झालेल्या ब्रह्मदेवास इंद्र सर्व देवांसह वंदन करितात. )

सूत्रधार—

अभंग.

हस्तकीं धरूनी, भद्रिं बैसवीत ॥ संतोषें पूजीत, विधी लागीं ॥ १ ॥
इंद्र ह्मणे प्रभो विश्वाचे निर्मीते ॥ आज्ञा या दासातें, काय सांगा ॥२॥

ब्रहस्पती— पद.

( पहिला कुसुंबी० या चालीवर. )

देव मुनेश्वर, मानव किन्नर, तुमचे पद वंदिती ॥
दर्शन दुर्लभ हें निश्चिती ॥ १ ॥
सिंव्हासन हें, आपुलें प्रभुजी, विश्रांती क्षणभरी ॥
घ्यावि हे दास विनंती करी ॥ २ ॥
दोष नसे कीं, यांत आमुचा, रोष कांहो अंतरीं ॥
आह्मि मिन आपण समुद्रापरी ॥ ३ ॥

(याप्रमाणें भाषण ऐकून ब्रह्मदेव देहभानावर येऊन, लज्जित होत्साता)

ब्रम्हदेव— पद. ( दादरा )

जातों मृत्युलोकीं ऐक बा शचीपती ॥
दुष्ट मन्मथ प्रसंगीं अंति दूर्गती ॥ १ ॥
नष्ट गोष्ट केलि स्पष्ट कष्ट वाटती ॥
रुष्ट तो प्रभू करी अनिष्ट निश्चिती ॥ २ ॥
थोर तो अनंत वेषधारि जगपती ॥
प्रार्थुनियां कारेन तपा, आज निश्चिती ॥ ३ ॥

( याप्रमाणें बोलुन लज्जित होत्साता मृत्युलोकाप्रत गमन करितो. )

इंद्र— साकी.

दोष कायसा यांत विधीचा, हरिहर तेही फसले ॥
परि हे विपरित गोष्ट, आमुचें पाहुनि मन आज भ्रमलें ॥
मळ या जगतिवरी ॥ नाहीं कामिनि सम दुसरी ॥ १ ॥

ब्रहस्पती— कामदावृत्त.

विघ्न जाहलें, दूर सुंदरी; जाई स्वस्थळा ब्रह्म कूमरी ॥
न करिं तूं आतां, खेद मानशीं; सूज्ञ थोर हें, सर्व जाणशीं ॥ १ ॥

( असें ह्मणून सर्व देवांसह ब्रहस्पती सरस्वतीस वंदन करितो. )

सरस्वती— पद.

(अरसिक किति हा सेला॰ या चालीवर.)

मन्मथ वैरी जगाचा ॥ अति तीक्ष्ण, दुःसह शर बाई याचा ॥ १ ॥ करि विव्हळ मनाशीं हा आमुच्या ॥ झाला नष्टदेही परि चांडाळ साचा ॥ २ ॥ यानें घात केला अहिल्येचा ॥ तारा गुरुपत्नीस्तव त्या, सुंदर शशिचा ॥ मन्मथ॰ ३ ॥

( याप्रमाणें गायन करीत सरस्वती सत्यलोकांप्रत गमन करिते. )

इंद्र— दिंडी.

चला आतां स्वस्थळां लागिं देव ॥
ईश्वराची अघटीत असे माव ॥
मनीं समजुनि हें श्रीहरी सेवनाला ॥
करुनि भोगावें अक्षयीं या पदाला ॥ १ ॥

( असें ऐकतांच सर्व देव, ब्रहस्पती आणि देवेंद्रा प्रत वंदनें करितात. रंभादी अप्सरा मुजरे करितात. )

चोपदार—राजाधिराज त्रैलोक्यनाथ देवेंद्रराज महाराज.–

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ६ वा.

स्थळ.—मृत्युलोक, सिंधुतीर, सरिता.

पात्रें.—ब्रह्मदेव, अभिजित राजा, राजपत्नी गुणवती,

ब्रह्मदेव— ( सिंधुसागरसंगमावर येऊन. )

### शिखरिणी.

जाहाली दुष्कीर्ती, मरण गमलें आज मजला ॥
करीं देवा आतां, मजवरि दया शुद्ध विमला ॥
जलाच्या योगानें, अनलहि धरी शीतल हिमा ॥
अहाहा !! कामाचा, ! अघटित पहा काय महिमा ॥ १ ॥

सूत्र०— **कटाव.**

लज्जित होउनियां विधि अंतरीं, शिघ्र पातला वसुंधरेवरि, येउनियां मग सागर तीरीं, पूर्व स्थळीं तो वना भीतरी, स्नान कराया सरीं रिघाला, त्यजी त्यास्थळीं निज विर्याला, शांत मनें मग तप करण्याला, जाउनियां निज ध्यानीं बसला, धिक्कारुनियां काम रिपूला, यापरि विधी निज स्थानाला, जाउनि करि ऊग्र तपाला ॥ १ ॥

### साकी.

त्याच स्थळीं ये अभिजित नृपवर, कांतेसह स्नानाला ॥
महा पर्वणी सुदिन ह्मणोनी, हर्षभरित मनिं जाहला ॥
पाहुनि एकांतां, बोलतसे ते गुण सरिता ॥ १ ॥

इंद्र— साकी.

दोष कायसा यांत विधीचा, हरिहर तेही फसले ॥
परि हे विपरित गोष्ट, आमुचें पाहुनि मन आज भ्रमलें ॥
मल या जगतिवरी ॥ नाहीं कामिनि सम दुसरी ॥ १ ॥

ब्रहस्पती— कामदावृत्त.

विघ्न जाहलें, दूर सुंदरी; जाई स्वस्थळा ब्रह्म कूमरी ॥
न करिं तूं आतां, खेद मानशीं; सूज्ञ थोर हें, सर्व जाणशीं ॥ १ ॥

( असें ह्मणून सर्व देवांसह ब्रहस्पती सरस्वतीस वंदन करितो. )

सरस्वती— पद.

( अरसिक किति हा सेला॰ या चालीवर. )

मन्मथ वैरी जगाचा ॥ अति तीक्ष्ण, दुःसह शर बाई याचा ॥ १ ॥ करि विव्हळ मनाशीं हा आमुच्या ॥ झाला नष्टदेही परि चांडाळ साचा ॥ २ ॥ यानें घात केला अहिल्येचा ॥ तारा गुरुपत्नीस्तव त्या, सुंदर शशिचा ॥ मन्मथ० ३ ॥

( याप्रमाणें गायन करीत सरस्वती सत्यलोकांप्रत गमन करिते. )

इंद्र— दिंडी.

चला आतां स्वस्थळां लागिं देव ॥
ईश्वराची अघटीत असे माव ॥
मनीं समजुनि हें श्रीहरी सेवनाला ॥
करुनि भोगावें अक्षयीं या पदाला ॥ १ ॥

( असें ऐकतांच सर्व देव, ब्रहस्पती आणि देवेंद्रा प्रत वंदनें करितात. रंभादी अप्सरा मुजरे करितात. )

चोपदार—राजाधिराज त्रैलोक्यनाथ देवेंद्रराज महाराज.-

( सर्व जातात. )

———

## प्रवेश ६ वा.

स्थळ.—मृत्युलोक, सिंधुतीर, सरिता.

पात्रें.—ब्रह्मदेव, अभिजित राजा, राजपत्नी गुणवती,

ब्रह्मदेव— ( सिंधुसागरसंगमावर येऊन. )

### शिखरिणी.

जाहाली दुष्कीर्ती, मरण गमलें आज मजला ॥
करीं देवा आतां, मजवरि दया शुद्ध विमला ॥
जलाच्या योगानें, अनलहि धरी शीतल हिमा ॥
अहाहा ! ! कामाचा, ! अघटित पहा काय महिमा ॥ १ ॥

सूत्र०— कटाव.

लज्जित होउनियां विधि अंतरीं, शिघ्र पातला वसुंधरेवरि, येउनियां मग सागर तीरीं, पूर्व स्थळीं तो वना भीतरी, स्नान कराया सरीं रिघाला, त्यजी त्यास्थळीं निज विर्याला, शांत मनें मग तप करण्याला, जाउनियां निज ध्यानीं बसला, धिक्कारुनियां काम रिपूला, यापरि विधी निज स्थानाला, जाउनि करि ऊग्र तपाला ॥ १ ॥

### साकी.

त्याच स्थळीं ये अभिजित नृपवर, कांतेसह स्नानाला ॥
महा पर्वणी सुदिन ह्मणोनी, हर्षभरित मनिं जाहला ॥
पाहुनि एकांतां, बोलतसे ते गुण सरिता ॥ १ ॥

गुणवती— पद.

( ऋतुस्नात आहें मीं तुम्हां ठाउकी० या चा० )

चार मास आह्मि राहतों या काननीं ॥
बहु कष्ट होति प्रियकरा तुह्मां लागूनी ॥ १ ॥
जप तप होमादीक देव पूजनीं ॥
हें तनमन धन अर्पिलें ईश चरणीं ॥ २ ॥
परि जाहलें नाहीं हेतु पूर्ण ह्मणुनी ॥
चिंता मज लागली प्रिया अनुदीनी ॥ ३ ॥ चाल ॥
यापरि ते गुणवती पतीशीं बोलत अवलीला ॥
नको आतां वनवास पुरे हा वाटतसे मजला ॥ १ ॥

राजा— दिंडी.

कसें जावें विन्मुख नगरासीं ॥ काय ह्मणतिल मला शौनक महाऋषी ॥
साधु वाक्य अन्यथा नसे कांते ॥ रहा धरुनि मनिं भाव या वनांतें ॥१॥

राणी—महाराज मला तहान फार लागली आहे.

सूत्रधार— साकी.

नृप वनिता गुणवती तेधवां, तृषाक्रांत बहू झाली ॥
विधी वीर्य ज्या जळीं मिळालें, अंजुलिनें तें प्याली ॥
राहे गर्भ तिला ॥ अघटित ईश्वरि हे लीला ॥ १ ॥

पद.

( अरुणापरि त्या गहन चमकती० या चालीवर. )

शिरतां उदरीं वीर्य विधीचें गर्भिणी ते जाहली ॥
गुणवती स्वमनीं संतोषली ॥ १ ॥
गर्भ तेज फांकलें चहुंकडे निर्भय अति शोभली ॥
पतीशीं काय तदां बोलली ॥ २ ॥

गुणवती— पद.

( मागील चाल चालू. )

जगदीशाचे पूर्ण दयेनें गर्भ मला राहिला ॥
रमापति आह्मांवरि तूष्टला ॥ १ ॥
शौनक मुनिनीं दया करूनी, वर आपणा दीधला ॥
तोचि हा प्रसाद मज लाधला ॥ २ ॥

राजा— पद.

( मागील चाल चालू. )

ऐके प्राणवल्लभे शुभांगे, मम मानस रंजनें ॥
तोषित जाहलों मृगलोचनें ॥ १ ॥
कष्ट जहाले, तुला जिवलगे, होम द्रव्य पुरवितां ॥
श्रमलिस कुसुम फुलें आणितां ॥ २ ॥
चाल आतां सुंदरी स्वनगरीं, भेटुं जनां तत्वतां ॥
पावलों इच्छित मनोरथा ॥ ३ ॥

सूत्रधार— श्लोक.

( वसंततिलका. )

तेव्हां त्वरीत नृपती, नगरीं निघाला ॥
राज्ञी करी स्तवन, आठवि शौनकाला ॥
तूं तात माय मज मी, तव कन्यकाची ॥
झाले असंख्य उपकार न वर्णवेची ॥ १ ॥

( असें ह्मणत ह्मणत सर्व निघून जातात. )

---

## प्रवेश ७ वा.

स्थळ-द्राविडदेश, कांचनावती, नगर राजमंदीर.

पात्रें-अभिजित राजा, ग्रंथ प्रधान, सभासद जोतीषी, सुवासिनी, चोपदार, चंद्रप्यारी. कुसमावती.

सूत्रधार— पद.

राग भूपकल्याण ताल धुमाळी.

अरण्य वासा, क्रमुनि भूपती, आनंदें ललनेसहित ॥
कांचनावती, शिघ्र पातला हर्ष प्रजेलागीं अमित ॥ १ ॥
राजमंत्रि बहु चतुर धुरंधर, एकनिष्ठ बुद्धीमंत ॥
निज स्वामी प्रति, तोषविती जे, दाउनियां सत्याचि पंथ ॥ २ ॥
नाहिं जनांचे दुःख मनाही, राजइष्ट चिंतन करीत ॥ ३ ॥
पूर्ण दिवस होतांचि प्रसवली, राज अंगना दिव्य सुत ॥
धांवति जन, पहावया तयाला, मंगल हें समजुनि वृत्त ॥ ४ ॥

( इतक्यांत दोन स्त्रिया रंगभूमीवर येतात )

चंद्रप्यारी— ठुंबरी.

राग झिंझोटी ताल त्रिवट.

( झाली ज्याची उपवर दुहिता० या चालीवर )

चाल सखे आज राज गृहाला ॥
जाउं पाहुं त्या अभिजित बाळा ॥ धृ० ॥
धन्य दिवस आज आनंदाचा ॥
सखये भासे प्रियकर मजला ॥ चाल० ॥ १ ॥

उल्हाट यंत्रें धडधड सुटती ॥
वाद्य गजर बहु नभीं कोंदला ॥ चाल० ॥ २ ॥
सुवासिनी वायनें घेउनी ॥
जाति दाटि बहू मार्ग रोधला ॥ चाल सखे० ॥ ३ ॥
धिमाकिटि धिमथा मृदंग वाजति ॥
नृत्य करिति या गणिका अबला ॥ चाल सखे० ॥ ४ ॥
सारिगम पधनी, निधपम गरिसा, सुस्वर ऐकुनि जिव
हा धाला ॥५॥ चाल सखे० ॥

**कुसमावती—** **कामदावृत्त.**

जोतिषी पहा, पातले सभे ॥ नृपति सन्मुख, मंत्रि हे उभे ॥
भाट नाटकी, कवि वर महा ॥ वर्णिती नृपालागीं हे अहा !! ॥ १ ॥

( इतक्यांत राजा, प्रधान आदिकरून सभेमध्यें प्राप्त होतात. )

**प्रथप्रधान—**

**पद.**

( दैव प्राधान्य उभयतांचे० या चालीवर )

धन्य भाग्य सार्थक जहालें ॥
पुण्यवंत महाराज प्रतापी, जगीं समजुनि आलें ॥ १ ॥
इश चरणीं मन हें रमलें ॥
त्याच्या सुदयें वंशीं आपुल्या, पुत्र रत्न जहालें ॥ २ ॥
विधि लिखिताक्षरही चुकलें ॥
अघाटित हें भासलें जनांशीं, मन आमुचें भ्रमलें ॥ ३ ॥ चाल ॥
एक सुर्य नाशी तिमिरा ॥ सुपुत्र भूषण हें नरविरा ॥
जाणुनि हर्ष सर्व अंतरा ॥ उदरीं येऊनि यश दिधलें ॥
पुण्यवंत महाराज प्रतापी; जगीं समजुनि आलें ॥ १ ॥

राजा— साकी.

जगदीश्वर सुदयेनें जहाला, तनय सत्य हें जाणें ॥
असो तयासीं, जाउनि आतां आणावें सन्मानें ॥
पूजुनि देवाद्विजा, द्यावीं वस्त्रें या भुभुजा ॥ १ ॥

सूत्र— श्लोक. ( वसंततिलका )

मग अभिजित रायें, सत्वरी बालकातें ॥
सचिव सपरिवारा, धाडि आणावयातें ॥
प्रमथ विर तदां तो, राजपुत्रासिं संगें ॥
उचलुनि कडिये तो, घेउनी ये स्वअंगें ॥ १ ॥

कटाव.

तो नृपतीसुत सभे पातला ॥ तातपदीं मस्तक ठेविला ॥
बाळक असुनी केली लीला ॥ गरगर गरगर वाढुं लागला ॥
चमत्कार वाटे सरवांला ॥ पिंगट त्याचे विशाळ डोळे ॥
सभे चालतां धरणी हाले ॥ वज्र देहिसा जनां भासलें ॥
प्रधानादिकां विचार पडले ॥ तर्करहित मनिं गर्क जहाले ॥
भटजीबोवा फारच भ्याले ॥ दक्षणेस जे सभे पातले ॥
भव्य देहि परि दिव्य भासला ॥ मधुर बोल तो बोलुं लागला ॥
साह्यकारिसा वाटे सकळां ॥ या परि त्या निजकुमराला ॥
पाहुनि नृप विस्मित झाला ॥ १ ॥

राजपुत्र— पद.

राग झिंजोटि ताल धुमाळी.

( नाहें तरी अर्जुन मारिल मजला॰ या चा॰ )

शरण प्रभू तव दास असे मीं, वंदन करितों चरणाला ॥ धृ ॥
कृपा असावी मजवरि ताता, ह्मणविन धन्य जागिं तुजला ॥
तव सुदयेनें सत्याचि कथितों, जिंकिन समरीं काळाला ॥ १ ॥ श॰ ॥

राजा—

साकी ( चाल १ ली. )

तोष मनामध्यें, बहुतचि जहाला; ये बैसे बा अंकीं ॥
ऐक सुपुत्रा कीर्तिध्वज तूं उभवीं बा तिहिंलोकीं ॥ १ ॥

( याप्रमाणें बोलून पुत्रास अंकावर घेतो. )

कुलगुरू—

पद.

( दैव प्राधान्य उभय० या चा० )

हे नृप श्रेष्ठा अवधारा, स्वस्थपणें परिसावि पत्रिका, वृतांत हा सारा ॥१॥ प्रिय होईल बहु असुरां, उग्र तपातें करुनि तोषविल मृत्युंजयशंकरा ॥२॥ जिंकिल पृथ्विवरिल वीरां, अमरलोकिंचे देव पावतिल, भय करण्या समरा ॥ ३ ॥ करिल बहु राज्य धरे वरती, सार्वभौम होईल पूत्र हा मिळविल जनिं कीर्ति ॥ ४ ॥ पुत्रवान सुंदर कांता, सुख भोगिल साधुनि, दोनही स्वार्था परमार्था ॥ ५ ॥ चाल ॥ गण येतें राशिस नाम, होईल बहु ज्ञानी परम, सकळांचा रक्षिल धर्म, पावेल सर्व अधीकारा ॥ राजेंद्रा परिसावी पत्रिका, वृतांत हा सारा ॥

राजा—

दिंडी.

तोष जाहला ऐकुनी गुरुवाणी ॥ गौरवावें या द्विजां वस्त्रदानीं ॥
हेम रौप्यादिक, मौक्तिकें अनेकां ॥ देउनियां संतुष्ट करा लोकां॥१॥

कुलगुरू—

साकी.

सर्व जाणता पुत्र असे हा, योग्यचि गुरु मंत्रातें ॥
बालक परि बहु दिसे जनाला, थोर आह्मांही गमतें ॥
यास्तव महाराजा, करणें गृह मंगल काजा ॥ १ ॥

राजा— आर्या.

व्रतबंध हा करूनी, लग्नादिक सर्व मंगलें त्वरित ॥
राज्यीं स्थापुनि याशीं, साधावें वाटतें मना स्वहित ॥ १ ॥

( याप्रमाणें आज्ञा करतांच सर्वत्रांस हार तुरे देतात व सर्व सभाजन उभे राहून राज्यास वंदन करितात. )

चोपदार—शौर्यसंपन्न गुणगंभीर भक्तिपरायण सत्वशील अभिजित महाराज.–

( सभा विसर्जन होते. )

---

## प्रवेश ८ वा.

स्थळ—अरण्य.

पात्रें—गणासूर, इंद्र, वरूण, अग्नी.

सूत्रधार— पद.

राग भूपकल्याण ताल धुमाळी॰
( पंचतुंड नररुंड. या चालीवर. )

ताताज्ञेनें अभिजित नंदन; तप करण्या काननिं येत ॥
राज्यसौख्य हें त्यागुनि सर्वहि, मृत्युंजय शंकर स्मरत ॥१॥
घोर वनीं एकांत पाहुनी, सरिता तिरिं आश्रम करित ॥
दहा सहस्र वर्षेंवरी तो, एक पदीं तप आचरत ॥ २ ॥
गणासूर हें नाम त्यागिलें, गणमुनिचा आश्रम ह्मणत ॥
दान धर्म व्रत नित्य करूनी, कंद मुळें भक्षण करित ॥ ३ ॥

( गणासूर अरण्यामध्यें, कांचनावतीचा त्याग करून प्राप्त होतो. )

**गणासूर —** पद.

( तारुण्याचा बहार बघुनी० या चा० )

हे शिव शंकर, गिरिजा कांता, विष पन्नग धारणा ॥
विश्वनाथ श्री काशिपुराधिश सृष्टि स्थिती कारणा ॥ १ ॥
महांकाळ ओंकार सुरेशा पशुपति स्मरदहना ॥
त्र्यंबक राजा गंगाधर हे, गौतम अघनाशना ॥ २ ॥
नागनाथ श्री केदारेशा, शिव जगदोद्धारणां ॥
सेतुबंध श्री शैल्यमल्लिका, घृष्ण त्रिपुरहननां ॥ ३ ॥

( याप्रमाणें शंकराची आराधना करून एका पायावर उभा राहून ध्यानस्थ होतो. )

**सूत्रधार—** पद.

( शारदे दासकामदे० या चालीवर. )

एकदिनीं, पाकशासनो, येई भूवनीं, संगे घेउनी, लोक पालांला ॥
पातला सहज तो सोडुनि अमरपुरीला ॥ १ ॥
उपवनें, बहुत काननें, फिरत बहु वनें, येइ शचिवर तो ॥
ज्या स्थळीं गणासुर दारुण करि तप बळि तो ॥ २ ॥
निज कर्म, आचरे धर्म, जाणुनी वर्म, शिवार्चन परम, करि उल्हासें ॥
ज्या सुतपस्तेजें मंद रवी नभिं भासे ॥ ३ ॥
शिव पंचाक्षर जप मंत्र, करी सू यंत्र, साधूनी तंत्र, उभा एक पायीं ॥
झाले कुंठित पाहुनि देव मनीं त्या ठायीं ॥ ४ ॥ चाल ॥
स्वस्थान हरण शंकीत शचिपती; ह्मणे चला जाऊं कैलासीं निश्चिती ॥
सांगू त्या पार्वति पतिला, हे रिती ॥
यापरी, चकित अंतरीं, होउनि नग अरी, वदे देवांला ॥
पातला भूवरी सोडुनि अमरपुरीला ॥

( देवांसह इंद्र प्रवेश करतो. )

इंद्र—

पद.

( राग खमाज ताल त्रिवट. )

( बाळा लक्ष्मणा गुणराशी० या चालीवर. )

कपटी दैत्य दिसे, हा मजला; ध्यातो पार्वतिपतिला ॥ १ ॥
दुर्मति दानव हे, जगताला; देती त्रास आह्माला ॥ २ ॥
जिंकिति शिव वरदें समराला; करिती उग्र तपाला ॥ ३ ॥
दिसतो दीनचि या समयाला; घेइल अमर पदाला ॥ ४ ॥
यास्तव योजुनियां युक्तीला; विघ्न करावें याला ॥ कपटी० ॥ ५ ॥

( याप्रमाणें बोलून इंद्र देवांसह कैलासाप्रत गमन करितो. )

सूत्रधार—

कटाव.

कैलासाचल, सोडुनि सुंदर, आला भूवरि तो गौरीहर, कुंद इंदु सम वर्ण केवळ, अर्धांगीं स्त्री बहू कृपाळ, शिरीं स्वर्धुनी दिसे सुशोभित, शुभ्र जटेचा मुकुट मंडित, किशोर भाळीं चंद्र विराजित, रुद्र गणादी उभे तिष्ठत ॥ चाल ॥ यापरितो शिव त्रिपुरारी ॥ पातला दीनकैवारी ॥

( श्री शंकर अपर्णेसह प्राप्त होतात. )

सूत्र०—

श्लोक ( मालिनी )

विनवणि दैत्याची, ऐकुनी देवराणा ॥
कळवळुनि मनीं तो, धांवला शिघ्र जाणा ॥
हिमनग दुहिता ही घेउनी ते अपर्णा ॥
सचाकित मनि पाहे, त्या गणा मेघवर्णा ॥ १ ॥

पार्वती—प्राणनाथ—

पद.

( वसंतसेना हरिणीसम या० या चालीवर. )

उग्र तपातें पाहुनि होतां, वश या दैत्यांदिकां ॥
भोलानाथ हें नाम आपुलें माहित ब्रम्हादिकां ॥ १ ॥
वर देणें तो सर्वा प्रियसा, होय जगीं सार्थका ॥
दुष्टाशीं वर अजिंक मिळतां, त्रास देति सकाळिकां ॥ २ ॥

शंकर—प्रिये.—

पद.

( वसंतसेना हरिणीसम या० या चालीवर )

ऐक प्राणवल्लभे प्रिये गे, सत्य वदसि हें परी ॥
भक्ताधिन मी न चले माझें बल कांहीं सुंदरी ॥ १ ॥
संकट समयीं माझे स्मरणीं, रत जे असति सदां ॥
रक्षितसें त्यां उडी घालुनी, वारुनियां अपदा ॥ २ ॥
दहा सहस्त्र वर्षें तप करितो एक पदीं राहुनी ॥
राज्य सुखादिक अन्नहि त्यजिलें, भाव धरुनियां मनीं ॥ ३ ॥

तस्मात् याचे मनोरथ पूर्ण न केले तर जगांत माझे ब्रिदाला कलंक लागणार नाहीं काय ? ( असें ह्मणून त्याचे जवळ जाऊन सावध करितो. )

सूत्रधार—

श्लोक. ( मालिनी. )

बहुत चकित झाला, अंतरीं दैत्य दाटे ॥
निरखुनि शिवगौरी, फार आश्चर्य वाटे ॥

करुनि पुजन भावें, वंदुनि पाय त्यांचे ॥
वदत हिनमती मीं, काय बा वर्णु वाचे ॥ १ ॥

गणासुर—

श्लोक.

( शार्दुलविक्रीडित. )

पाहुनियां, प्रभुच्या रुपाशिं जहाला; चित्तांत संतोष तो ॥
दीनानाथ विभो क्षमस्व भगवन्, हा दास पायीं रतो ॥
कीं व्हावी न विटंबना पशुपते, राहो दया सेवकीं ॥
मानावें मज आपुला प्रिय तुझां, कंठीं जसा वासुकी ॥ १ ॥

शंकर—

आर्या.

होशिल मम भक्तजगीं, कीर्ति तुझी वर्णितील सुरनर ते ॥
पाहुनि प्रताप तेजा, तव रिपु हृदयीं सदां विनाश रते ॥ १ ॥

सूत्र०—

श्लोक. ( वसंततिलका. )

देऊनि वांछित वराप्रति त्या गणाला ॥
गौरीसहीत शिव तो मग गुप्त झाला ॥
त्यानंतरें त्यजुनिया, गहना तपातें ॥
आला स्वकीय सदना मग हर्ष चित्तें ॥ १ ॥

( याप्रमाणें आशिर्वाद देऊन शंकर गुप्त होतात व गणासूर कांचनावती प्रत गमन करितो. )

## प्रवेश १ वा.

( स्थळ—राजदरबार. )

पात्रें–अभिजित राजा, प्रधान, सेनापती विश्वजीत, गुणवान, गणासूर.

सूत्र०—

श्लोक. ( मालिनी. )

नृप सुत मग तोये, शिघ्र सन्मूख त्यासीं ॥
मिरवत गजरेशीं, आणिले त्या सभेशीं ॥
नरवर अवनीचे सर्व तेथें मिळाले ॥
निरखुनि नृप पुत्रा, सर्व सौख्यें निवाले ॥ १ ॥

( सभेमध्यें गणासूर येतो )

प्रधान ग्रंथ—

पद.

( बा काय घालशिल संसृतिचा पिंगा० या चालीवर )

ईश कृपाही पूर्ण तुह्मां वरुती ॥
जाहली सत्य हें वाटे मम चित्तीं ॥ १ ॥
सर्व देशिंचे साह्य पहा भुक्ती ॥
ऐकूनि सुकीर्ती धन्य जनीं ह्मणती ॥ २ ॥
वंशदीप हे गणासूर सुमती ॥
जन्मुनी दीधलें यश आपणा निश्चिती ॥ ३ ॥
पूर्व पूण्य वाटतें फळा आलें ॥
ऐकुनी वृत हें मन आमुचें रमलें ॥ ४ ॥

राजा—

पद.

( लंकेहुनी अयोध्ये जातां० या चालीवर )

सार्थक जहालें या संसारी ॥ निश्चय केला आज अंतरीं ॥
जाउनि आतां वनांतरीं ॥ सेवूं हरिचरणां ॥ १ ॥
मिथ्या माया मोह पसारा ॥ जाणुनि अंतरि नृप अधिकारा ॥
द्यावें सिंव्हासन या कुमरा ॥ निश्चय हा केला ॥ २ ॥

गणासूर—

पद.

( दैव प्राधान्य उभयतांचे ० या चालीवर. )

करितो विनती चरणाला ॥
जाउं नये काननीं रहावें स्वस्थाचि नगराला ॥ १ ॥
सेविन या शुभ चरणाला ॥
सार्वभौम ह्मणवीन आपणा हे इच्छा मजला ॥ २ ॥
जिंकिन समरीं भूपतीला ॥
छत्र धरिन आपुल्या मस्तकीं, दंडिन काळाला ॥ ३ ॥ चाल ॥
नाहिं सुख आपणा दिधलें ॥ मनीं हें शैल्य फार रहालें ॥
अयुत वर्ष कानन क्रमिलें ॥ आतां मीं शरण चरण कमला ॥
जाऊं नये काननीं रहावें, स्वस्थाचि नगराला ॥ १ ॥

राजा--

ओंवी.

बहुकाळ हा राज्यभार ॥ चालवितां श्रमलों मीं फार ॥
आतां मानसीं माझे विचार ॥ तपा वांचुनी नसे दुजा ॥ १ ॥

गणासूर—

साकी.

मानसिं माझे हेतु असे कीं, जावें दिग्विजयाला ॥
जिंकुनियां भूपती सर्वही सेविन राज्यपदाला ॥
निश्चय हाचि मना ॥ केला भूपति कुलभुषणा ॥ १ ॥

राजा—

साकी.

बैसुनि सिंव्हासनी सुपुत्रा, राज्यभार वाहून ॥
मग जावें विजयार्थ सचिवहि, सैन्य सवें घेऊन ॥
ऐके मम वचना ॥ मान्य करीं तूं कुळभुषणा ॥ १ ॥

सूत्रधार—

ओंवी.

मग विप्राशीं पाचारूनी ॥ रायें आणिलें सभा स्थानीं ॥
गणासुराशीं राज्यासनीं ॥ बैसवीत संतोषें ॥ १ ॥

कटाव.

राजाज्ञा परिसुनि सत्वर, उभे राहिले प्रधान चार, मुख्य मंत्री तो ग्रंथ चतूर, गुणवान दुजा अती पवित्र, प्रथम वीर तो धैर्य सागर, विश्वजीत चौथा सरदार, अनेक येती राजधुरंधर, शास्त्री पंडित विप्र हि थोर, मंत्र अक्षता गणासुरावर, टाकिती ब्राह्मण वारंवार, यापरी त्या नृप पुत्राला, सिंव्हासनिं मग स्थापिला ॥ १ ॥

राजा—

साकी. ( चाल २ री. )

निजहितकर माझें ही पुत्रा, संरक्षीं धर्माला ॥
प्रजा जनाशीं, सौख्य निरंतर, द्यावें या आज्ञेला ॥
करूनीया दिधला ॥ सर्वहि कारभार तुजला ॥ १ ॥

( इतक्यांत प्रजाजन येतात. )

प्रजाजन—

श्लोक. ( शिखरिणी. )

अनाथासीं आह्मां, तुजविण गमेनाचि सहसा ॥
जसें मातेवीणें शिशुमनिं झुरे रात्र दिवसा ॥
ह्मणूनीयां आह्मीं, विनति करितों जोडुनि करा ॥
नका जाऊं स्वामी, त्यजुनि वनिं आह्मां प्रियकरा ॥ १ ॥

राजा—

ओंवी.

निश्चयें जाऊनि काननां ॥ सेवीन त्या श्री जनार्दना ॥
निदानाचिहे विज्ञापनां, सांगा जाऊनि सर्वांशीं ॥ १ ॥

ग्रंथ—

आर्या.

राज्य दिल्हें पुत्राशीं, परि काननिं सांप्रतीं कसें जातां ॥
पाहण्या अनुभव घेण्या विनती, राहिं इथेचि नृपनाथा ॥ १ ॥

गणासूर—

साकी. ( चाल २ री. )

पृथ्वी दिग्विजयास्तव द्यावी आज्ञा मजला आतां ॥
जिंकुनियां भूपती सत्वरीं, येईन तात समर्था ॥
विनती दासाची ॥ आज हे मान्य करा साची ॥ १ ॥

राजा— फार उत्तम आहे.

चोपदार—राजाधिराज गणासूर राज महाराज-कचेरी बरखास्त.

( सर्व जातात. )

———

## प्रवेश १० वा.

स्थळ-- अमरपुरी अरण्य.

पात्रें—गणासूर, प्रधान, इंद्र, मातली, देव.

सुत्र०— कटाव.

गणासूर तो अभिजित नंदन, निघे सत्वरी रथीं बैसून, संगे चाले असंख्य सैन्य, अग्रि धांवती थाट रथाचे, अचाट उंष्ट्र मागें त्यांचें, वाट निघेना ऐशी दाटी, तया मागुनी स्वार कचाटीं, पायदळांचे वीर अमिती, उल्हाट यंत्रें शस्त्रें हातीं, घेउनि तेव्हां गाजि धांवती, अजी चलाहो सत्वरि ह्मणती डंका नौबती बहू गर्जती. मार्गीं जिंकिति अनेक नृपती, कोणि शरण तात्काळचि येती, कोणि खंडणी देऊं ह्मणती, कोणी व्यर्थचि प्राणां मुकती, युद्ध करूनी कीर्ति मिळविती, अमित भूपती सख्यचि करिती, यापरि तो अभिजित कुमर, ये अमरावति सत्वर ॥ १ ॥

कामदावृत्त.

जिंकुनी महावीर भूपती, येइ सत्वरी, अमरावती ॥
गण तदां ह्मणे सेवकजनां, जावुं पाहुं या स्वर्ग भूवनां ॥ १ ॥

श्लोक. (शिखरिणी)

धरुनीयां हेतू अमरपुरिचा मार्ग धरिती ॥
पथीं जातां लागे वन बिकट घोरांदर अती ॥
थवे शार्दूलांचे, विचरति मृगेंद्रादिकमहा ॥
अशा आरण्यातें क्रमित गण तो निर्भय पाहा ॥ १ ॥

कटाव.

सचिवादिक घेउनि सांगा ते, त्वरें पातला तो स्वर्गातें, नंदन वनिं येउनियां स्वमतें, दिव्य वस्तु पाहुनि नृपनाथें, तोष दाखवी निज भृत्यांते, उच्चैःश्रव हय वर तो पाहुन, बैसे त्यावरि शिघ्र जाऊन, हर्ष भरित फिरवी त्यालागुन, इंद्र पातला तें जाणून, क्रोधें त्याशीं बहु निंदून, युद्ध मांडिलें मग निर्वाण ॥ चाल ॥ यापरि त्या अमरपुरीला, येउनियां अनर्थ केला ॥ १ ॥

( या प्रमाणें नंदनवनांत उच्चैःश्रवा शामकर्ण फिरत असतां पाहून. )

गणासूर—

आर्या.

आश्चर्य मला वाटे, पाहुनिया अंतरीं हयासी या ॥
आतां बैसुनिया वरी, पाहुं कसा चालतो वनासीं या ॥

( या प्रमाणें बोलून तो गणासूर त्या अश्वारूढ होऊन चपल गतीनें चालवीत आहे इतक्यांत, मातलीच्या सांगण्या वरून क्रोधाविष्ट झालेला इंद्र त्या स्थळीं येतो. )

इंद्र—

कामदावृत.

दुर्मती खला, दानवा वनीं ॥ थरिशि कां हया सांग येउनी ॥
अंतकें तुला बाहिलें असे ॥ ह्मणुनि बुद्धि हे झालि गमतसे ॥ १ ॥

( या प्रमाणें बोलून इंद्र क्रोधानें वज्रप्रहार करितो तेव्हां )

सूत्रधार—

## पद.

राग लीलांबरी, ताल धुमाळी.

( ब्राम्हण कन्या नव्हे० या चालीवर. )

दुष्ट वचन तें पडतां कानीं ॥
गणासुराचे मनीं, गेला कोपाग्नी भडकुनी ॥ १ ॥
रक्तवर्ण ते, नेत्र करूनी ॥
भृगुटी चढवी वरी, भयंकर मेघ गर्जना करी ॥ २ ॥
अश्वावरूनी, खालीं उतरुनि, ॥
धावें इंद्रावरी, पावले सुर भीती अंतरीं ॥ १ ॥ चाल ॥
देवेंद्रानें वज्र पुन्हा प्रेरिलें ॥
घोर भयंकर युद्ध बहुत जाहलें ॥
सर्व देवि ते शक्तिहीन दीसले ॥
गणासूर तो क्रोधें इंद्रा, धरणीवरि पाडुन ॥
किं गेला कोपाग्नी भडकुन ॥ २ ॥

( या प्रमाणें इंद्रास मूर्छीत करून. )

गणासूर—

## आर्या.

आलों स्वर्ग पहाया ॥ नलगे त्वत्पद मला जरी हरिलें ॥
सुखकर भूलोकींचें ॥ राज्य पुरे हें तुला असो वरिलें ॥ १ ॥

( असें बोलून गणासूर प्रधानासह मृत्यु लोकीं गमन करितो )

सूत्रधार—

## पद.

( राग भूपकल्याण ताल धुमाळी. )

चकित मनीं तेधवा होउनी ॥ गेला इंद्र सभास्थानीं ॥
ह्मणे गुरू तें दैत्य प्रबल हा, जाहाला शिव वरदें करूनीं ॥

( या प्रमाणें बोलून सर्व देव निघून जातात. )

## प्रवेश ११ वा.

स्थळ—अरण्य, सरिता, कपिल महामुनीचा आश्रम.

पात्रें—गणासूर, प्रधान, सेनापती, अष्टप्रधान, कपिल महामुनी, देवांगना, देवदूत, शिष्य मंडळी.

### पद.

( ऐका हो जन ऐका शिवरात्र कथा० या चालीवर. )

जिंकुनियां वसुमतिला, अभिजीत सुत ।। दाऊनि, प्रताप इंद्रा करी गर्वहत ।। ये भूवरि बहु हर्षें, सबला सहित ।। भूपति सर्व तयाच्या, चरणा नमित ।। श्री शंकर वरदानें, होइ नित्य हित ।। राज्य करी बहु वर्षें, सचिवां सहित ।। सुंदर वनिता त्याची, सेवेशिं रत ।। सुलभ आणि शुलपाणी, अति बुद्धिमत ।। अद्भुत प्रताप पहातां, मृत्यूहि भित ।। प्रौढ प्रतापी नृपहा, धरि शुद्ध पथ ।। जिंकुनियां वसुमतिला ।। १ ।।

( गणासूर प्रधानासह प्रवेश करितो. )

गणासूर—

### पद.

राग कालंगडा ताल धुमाळी.

(पहातां पहातां धर्म बुडाला० या चालीवर.)

चला जाऊं आज मला वाटतें, मृगया करण्या घोर वनां ।।<br>
इच्छा अंतरिं बहुत जाहली, सर्वे घेउनी हे सेना ।।<br>
शशक मृगादिक वनपशु सर्वहि वास करीती त्या स्थानां ।।<br>
विहार करण्या राहूं या स्थळिं, ऐकावें या मम वचना ।।१।।

सूत्रधार—

कटाव.

घोर वनीं तो भूप चालिला, सवें घेउनी अमित विरांला, कृष्ण वर्ण वस्त्रें सर्वांला, धांवति श्वापद दाहि दिशांला, अरण्य पशुंनीं पळ काढिला, उल्हाट यंत्रांच्या नादाला, ऐकुनि पक्षां प्रळय वाटला, अनेक पशु मारूनि तयांला, पाठविती मग ते नगराला, यापरि भ्रमतां नृप तो श्रमला, सरिता सुंदर पाहुनि रमला, यापरि तो अभिजित कुमर, ऋषिआश्रमिं ये सत्वर ॥ १ ॥

आर्या.

संगें घेउनि निजगण, कपिलाश्रमिं दर्शनार्थ आला हो ॥
नमुनि ह्मणें स्वामीचा, दर्शन मात्रेंचि लाभ मज लाहो ॥ १ ॥

कपिलमुनी—

श्लोक. ( मालिनी. )

आलासि कोठुनि नृपा, दिससी भुकेला ॥
राहे सुखेंचि तरि आश्रमिं भोजनाला ॥
कोठें तुझें गृह सुमंगल नाम काय ॥
पाहूनियां तुज प्रती मनिं हर्ष होय ॥ १ ॥

गणासूर—

साकी.

द्रविड देशिंचा होय जनीता नृप अभिजित तो माझा ॥
गणासूर या देहा ह्मणती, दैत्य वंश महाराजा ॥
वनिं या बहु श्रमलों ॥ पाहुनि तव चरणा रमलों ॥ १ ॥

मराठी ... ठाणे.



कपिलमुनी—

**साकी.**

जाउ नये त्वां क्षुधातूरसा, येउनियां नृपनाथा ॥
सैन्यासह तुज निमंत्रिलें कीं करिं भोजन बा आतां ॥
अभिजित कुलभुषणा ॥ मान्य करीं या मम वचना ॥ १ ॥

सूत्रधार—

**कामदावृत्त.**

शंकित मनीं, दैत्य होतसे; वित्र वाक्य हा पूर्ण करि कसें ! ॥
स्नान करुनियां, येतों सत्वरीं; बोलुनी असें ये नदी तिरीं ॥ १ ॥
( असें ह्मणून गणासूर वंदन करून नदीतिरीं येतो. )

**ओंवी.**

कंठींचा चिंतामणी काढोनी ॥ करी पूजन तो कपिलमुनी ॥
ह्मणें नृप समुदाया लागुनी ॥ षड्रसान्नें देइ जे ॥ १ ॥

कपिलमुनी--

**अभंग.**

पूरवीं वासना, तया भूपतीची, रक्षावी आमुचि लज्या आतां ॥१॥
देवदूत यावे अंगनांसहित, करीं राजा तुष्ट अन्नरसें ॥ २ ॥

सूत्रधार—

**आर्या**

चिंतामणी प्रसादें, आले बहु देवदूत त्यास्थानीं ॥
देवांगनाहि तैशा, मृगनयना पातल्या तदां रानीं ॥ १ ॥

( याप्रभाणें भोजनाची सिद्धता झालेली पाहून—राजास परिवारासह बोलाविण्यास्तव कपिलमुनी शिष्याला पाठवितो. नंतर राजा भोजनास सर्वांसह येतो, तेव्हां )

सूत्रधार— कटाव.

देवदूत सामोरे येती, सत्कारुनियां हात जोडिती, सर्व सिद्धता झाली ह्मणती, चला भोजनां लागीं ह्मणती, नीर कलश त्यां देति भरोनी, लाल पीत पीतांबर घेउनी, परिधानास्तव देति आणुनी, पात्रें दाविति उभे राहुनी, काढुनि स्वस्तिक सुवर्ण ताट, सोन्याच्या अड- णीवर वाट, भवतां फळशाखांचा थाट, मुद भाताची वरण दाट, आलें लिंबू डाळ खोबरें, चटण्या कोशिंबिरी प्रकारें, वाटाणे वालांच्या उसळी, दुध वाटीमध्यें पिकलीं केळीं, घिवर घारगे जिलब्या बसने, बुंदी लाडू बहु पक्वान्नें, संपादाया त्यांची मर्जी, आधि वाढिली पात्रिं करंजी, भात केसरी बहुत कूसरी, वाढिति सुंदर देव अंगनां, त्या शशिवदना, सरळ नाशिका, दिव्य बायका, कुरळ केश मृगनयन साजिरे, हात गोजरे, पांई रुणझुण करिति नेपुरें, पात्रें वाढिति चपल सत्वरें, श्रमले ह्मणुनी घालिति वारें, अनंत ब्रह्म रसानुभवानें, सर्व जेविले संतोषानें, केतकसम गंगेरी पानें, विडा अर्पिला बहु सन्मानें, यापरि मुनिगण असुराला, दे भोजन त्या समयाला ॥ १ ॥

( याप्रमाणें भोजन झाल्यानंतर देवदूत देवांगना वगैरे सर्व गुप्त होतात. )

सूत्रधार— आर्या

नाठवुनी उपकारा, अपकारा दूर्जन सदां करिती ॥
निंदिति जन त्या पुरुषा, अपकीर्ती पावुनिच मग मरती ॥ १॥

गणासूर— पद.

( दो दिवसांची तनु हे साची०—या चालीवर. )

उपकाराचे बहुत जहाले, पाहुनियां सत्काराला ॥
कोठुनियां हें अन्न आणिलें, मुनिवर्या सांगें मजला ॥

मम मंदिरीं जें वैभव त्याहुनि सहस्त्र गुणें थाटचि दिसला ॥
सांगावें मज गुह्य स्वामिया काय मंत्र योगहि आपुला ॥ १ ॥

कपिल०— अभंग.

चिंतामणीचा हा प्रताप भूपती, आमची संपत्ती मणी हाची ॥
त्याचीये योगानें आश्रम धर्माला, चालवी भूपाळा बहू साल ॥

गणासूर— पद.

राग कालंगडा ताल धुमाळी.

सृष्टी स्थिती लय, इच्छा मात्रें, करिशी तूं मुनिवरा ॥
तुझ्याला रुद्राक्षचि हा बरा ॥ १ ॥
भस्म लावुनि उग्र तपातें, करणें वनांतरा ॥
नसे हा योग्य तुजप्रती हिरा ॥ २ ॥
मी भूपति हा भूषण आमुचें, नेतों आज मंदिरा ॥
अमोलिक नाहीं असा दूसरा ॥ ३ ॥

कपिल— आर्या.

चिंतामणि प्राणचि हा, सत्य असे जाण गा नृपा माझा ॥
मागो नको न देया, करुनि दया आजि हे महाराजा ॥ १ ॥

गणासूर— सवाई.

मंद मती तुझी, तापसी काननीं, राहुनी नेणतसां अधीकारा ॥
नृप आज्ञा भंग, थोर दोष असे, सूज्ञहि सांगति या सूविचारा ॥
कोण असे जगीं, साम्य करी मशीं, मारीन काळासही शची कांता ॥
नेतो पाहें आतां रत्न हें सुंदर, काय करील तो माझें विधाता ॥ १ ॥

( याप्रमाणें बोलून ऋषीचे हस्तांतून बलात्कारानें मणी घेऊन परिवारासह गणासूर नगराप्रत गमन करितो. )

कपिलमुनी—( क्रोधानें )

श्लोक. ( शिखरिणी. )

कृतघ्ना हे दुष्टा, अभिजित सुता मूढ कुटिला ॥
मदांधा गर्वानें हरुनि मणि तो जलपाशि खला ॥
विनाशीं हे बुद्धी तुजसि सुचली सत्य गमतें ॥
नको नेऊं माझा, मणि जिव तसा हा नरपते ॥ १ ॥

( असें ह्मणून तो कपिलमुनी मणिविरहदुःखानें मूर्छित धरणीवर पडतो, इतक्यांत आदिमाया सुंदर तेजःपुंज कुमारिका येऊन )

आदिमाया— पद.

( अरुणापरि त्या० या चा० )

श्री विष्णूनें मला धाडिलें, वृत्त सांगण्यातुला ॥
ह्मणुन मीं आल्यें या भूतला ॥ १ ॥
उपाय तुजला आतां सांगतें सत्याचि मूनेश्वरा ॥
त्यजुनियां शोक ऐक उत्तरा ॥ २ ॥
गणासुरानें तप करूनी, तोषविलें शंकरा ॥
पावला मनिच्या इछित वरा ॥ ३ ॥
शिवगिरि-जाधव भक्त असे हा, आजिंक अमरेश्वरा ॥
मारण्या नाहिं बली दूसरा ॥ ४ ॥
तरी करूनी अनुष्टान आराधीं लंबोधरा ॥
जिंकिल तोचि तया पामरा ॥ ५ ॥ चाल ॥
विधिनें अठरा लक्ष जप करीं प्रिती ॥
होम तर्पणें द्विज-भोजन निश्चिती ॥
प्रगट होईल सिद्धिबुद्धिचा पती ॥
भक्तकाजकल्पद्रुम प्रभु तो मारिल तव शत्रुला ॥
ह्मणुनियां आलें या भूतला ॥ १ ॥

सूत्रधार—

साकी.

शक्ति वाक्य तें परिसुनि यापरि वंदन करुनी तिजला ॥
गणासुराचे नाशास्तव तो, आरंभित हवनाला ॥
प्रार्थी जगदीशा ॥ पूर्ण करीं तूं मम आशा ॥ १ ॥
(याप्रमाणें हवनाची सिद्धता करितो व आदिमाया गुप्त होते)

कपिलमुनी—( अग्नीकुंडासंनिध येऊन )

पद.

राग काफी ताल त्रिवट.

( कोण सुशीला प्रसवली तुजला० या चा०)

ओंकार स्वरुपा जैश्री गजानना गिरिजा सूता, वेद साराहो ॥ १ ॥
अगम्य लीला तुझी वर्णवेना कोणां विश्वपती विश्वंभराहो ॥ २ ॥
सिद्धी बुद्धिपते प्रभो विश्ववंद्या, धावें पावे जगदीशाहो ॥ ३ ॥
शरण आलों देवा, चरण दावी दासा, पुरवीं मनींचिही आशाहो ॥ ४ ॥
वक्रासुरादिक, मारूनी स्वांगें तारिला ब्रह्मा निजांगेंहो ॥
कवि केशवसुत निशिदीनीं प्रार्थीत दासारक्षणीं तूं भागेंहो ॥ओं० ॥१॥

साकी.

दूर्धर अतिशय संकट पडलें, काय करूं मी आतां ॥
कृपाघना या समयीं तुजविण अन्य नसे मज त्राता ॥
विनती चरणाशीं, द्यावें दर्शन दासाशीं ॥ १ ॥
( या प्रमाणें स्तुती करून हवन करीत असतां. )

सूत्रधार— **कटाव.**

सिद्धि बुद्धिसह, तो गजवदन निघे बाहेरी प्रभु कुंडांतून; प्रगट होई सिंव्हावरी बैसून, कोटि भानुसम तेज गहन, अरुण रंग अति प्रकाश गंभिर, दिव्य मेखला फरशांकुशधर, मस्तकिं विलसे मुगुट सुंदर, रुणझुण करिती पदीं नेपुर, माळ गळ्यामध्यें रम्य मनोहर, मृगेंद्र वाहन उग्र भयंकर, हरि मायेचा बोध चांगला, मुनिच्या हृदयीं पूर्णाचि ठसला, कंठ दाटुनी सद्गद झाला, परोपरीनें स्तवी प्रभूला॥ यापरि त्यानिशि समयासीं, अवलंबी प्रभुस्वरुपाशीं ॥१॥

कपिलमुनी— **पद**

राग खमाज, ताल दादरा.

(रामचंद्र नाहिं घरीं, काय मीं करूं० या चा०)

राक्षिं विभो शरण तुला, त्राहिं जगादिशा ॥
हीन दीन पदीं लीन हे गणाधिशा ॥ राक्षिं० ॥ १ ॥
हिमनगजा प्रियकर हे ईशनंदना ॥
एकदंत वक्रतुंड नागभूषणा ॥
रक्तगात्र धुम्रनेत्र शुभ्र वासनां ॥
चित्रमाल मौक्तिकालि, हार साजिरा ॥
पाहुनियां दिव्यरूप हर्ष अंतरा ॥ राक्षिं० ॥

गणपती— **पद.**

( वसंतसेना हरणी० या. चा० )

सिंव्हारुढ मीं सिद्धिविनायक, सगुण रूप धरुनी ॥
अवतरलों या वसुंधरेवरि, भाक्ति तुझी पाहुनी ॥ १ ॥
काय कामना असे मानशीं, सांगे मज लागुनी ॥
त्यजि चिंता भय शोक आतां बा, ऐकें कपिल मुनी ॥ २ ॥

कपिल०—

पद.

( दैव प्राधान्य० या चा० )

दुःख दीधलें बहु मजला, गणासुरानें अन्यायानें चिंतामणि हरिला ।।
माझा प्राणगमे नेला, घोरवनीया निशिदिनी पुरवी जो साहित्याला ।।
इंद्रें तोषुनिया मजला, अमरलोकिंचा दिव्यहिरा तो सप्रेमें दिधला ।।
।।चाल।। मारुनि त्या खल दैत्याला, द्यावा चिंतामणि मजला ।।
झणुनी प्रार्थियलें तुजला, शरण मीं तुमच्या चरणाला ।।
गणासुरानें अन्यायानें चिंतामणि हरिला ।। १ ।।

गणपती—

पद.

राग खमाज ताल रूप.

( घणी सकल तरणि कुलज० या चा० )

मान्य केलें तव वचन, मान दिला रे ।। धृ० ।।
त्यजिं चिंताकपिलमुनी, राहे आतां स्वस्थमनीं ।।
मारिन तव शत्रु रणीं, देइन मणी, शिघ्र तुलारे ।। मान्य० ।।

कपिलमुनी— साकी.

अभय वाक्य तें परिसुनि प्रभुजी; हर्षमना बहु झाला ।। ।।
राहावें आश्रमीं दयाळा, पुरवीं मम हेतूला ।। ।।
ऐकें सिद्धिपती ।। दासाचीया दिन विनती ।। १ ।।

गणपती—फार उत्तम आहे.

( असे म्हणून परिवारासह कपिलाश्रमींच वास करितात ).

———

## प्रवेश १२ वा.

स्थळ–गणासूराचे मंदीर

पात्रें–गणासूर, मधुमालती ( स्त्री ), प्रधानग्रंथ, विश्वजीत गुणवान, अभिजित, चोपदार.

सूत्रधार— ओंवी.

निद्रिस्त असतां मंचकावर ॥ घाबरून उठला गणासूर ॥
आज्ञापी सेवकां सत्वर ॥ पाचारित प्रधानां ॥ १ ॥

मधुमालती— कामादवृत्त.

खडबडोनियां मंचकावरी, बैसलां प्रिया कां असे तरी ॥
भीति वाटली कां हो अंतरा, स्वप्न पाहिलें काय प्रियकरा ॥१॥

गणासूर— साकी.

ऐक प्रिये जिवलगे अतां मीं, पाहियलें स्वप्नातें ॥
थोर भयंकर पुरुष येउनी क्रोध दाखवि मातें ॥
घेउनि फरशाला, उडवी माझे शिरकमला ॥ १ ॥

राणी— पद.

( राग भूपकल्याण ताल धुमाळी )

( पाहतां पाहतां धर्म बुडाला० या चालीवर. )

निंद्य जनामध्यें, होईल ऐसें कर्म, कशास्तव बळें करितां ॥
कमि नाहीं या जगिं आपल्याला, हट्ट प्रियकरा मनि धरितां ॥ १॥
स्वधर्म रक्षण सूज्ञ करिती, सर्व माहिती हे असतां ॥
हीन दीन तो विप्रतापशी, चिंतामणि त्याचा हरितां ॥

न्यायिकिं हा अन्याय पहावा, स्वमानसिं हा ममकांता ।।
कपिलमूनीच्या वरप्रसादें, सर्व सिद्धि भावें नमितां ।। चाल ।।
मामंजींचें मान्यकरा वचन ।। सांगत्यें तुह्माला सखया करजोडून ।।
अनेक रत्नें ते देतिल आणुन।।परोपरिनें विनवुनि साति ते मोहित नृपनाथा।।
कामि नाहीं या जगिं आपल्याला, हट्ट प्रियकरा कां धरितां ।। १।।

गणासूर—

पद.

राग खमाज ताल रूप.

नकरीं खेद मनीं मृगनयनीं, प्राणप्रिये प्राणप्रिये गे ।। धृ० ।।
स्वप्नांतिल गोष्ट सत्य, मानु नये ही असत्य।।
काळहि मज पाहुनि भीत, जोडुनि हस्त, शरण सयेगे ।
नकरीं खेद मनीं मृग नयनी, प्राणप्रिये प्राणप्रियेगे ।। १ ।।

( या प्रमाणें बोलत आहे इतक्यांत प्रधानादिक प्राप्त होऊन वंदने करितात. तेव्हां राणी अंतरगृहांत गमन करिते )

अभिजित—

आर्या.

स्वप्न भयंकर, शयनीं पडलें मज काळजी तमीं बुडवी ।।
माझ शिराशिं कोणी, अत्यद्भूत पुरुष परशुनें उडवी ।। १ ।।

ग्रंथ—

साकी.

परवस्तू अभिलाष, निंद्य हा, ब्रह्मद्वेष अनिवार ।।
कृतघ्नताही घातक समजा, बोलति वेदहिसार ।।
चिंतामणि हारिला ।। विपरित गोष्ट गमे मजला ।। १ ।।

गुणवान— पद.

( बा काय घालशिल संश्रतिचा पींगा० या चालीवर. )

देवहुतीच्या सुता कपिल मुनिला, क्षोभाविलें हा अन्यायचि जहाला ॥
साठ सहस्त्र अर्जिक सगरांला, जाळिले क्षणार्धे कोपुन नृपतीला ॥
सर्पमुखीं घातलें करा आपुल्या, कीं अग्न लाविला वाटे सदनाला ॥
तरि जाउनियां समजाउनि मुनिला, देऊनी मणीतो रक्षीं प्राणाला ॥१॥

विश्वजीत—

साकी. ( चाल दुसरी. )

अधमचि मजला वाटति जनजे, निजस्वामी लघु ह्मणती ॥
धिक्क तयाचें जिणें भासतें अबला सम ते जगतीं ॥
समजुनि हेंचि मनीं, मारावा तो कपिलमुनी ॥ १ ॥

गुणवान—

साकी. ( चाल २ री. )

वदलों परिमी, तुमच्या चित्ता, बरवें तेंचि कराहो ॥
माझें भाषण मजपाशीं तें, जाहलें सर्वहि राहो ॥
देव द्विज स्थानीं, क्रोध नसावा श्रुतिवाणी ॥ १ ॥

विश्वजीत— पद.

राग भूपकल्याण ताल धुमाळी.

( हरहर शिव शिव काय विषय हा देव पुजा करिता० या चालीवर. )

ऐकावें महाराज स्वामियां, प्रौढप्रतापी सुरवीरा ॥
अखंड विजयी सदां यश तुझें, प्रकाशलें कीं रणधीरा ॥ १ ॥
दिनमपि रजनीं धाक वहाती, शत्रु तुझे नित्याहि समरा ॥
तवबल सूर्य करा सम नाशी, रणांगणीं रिपुबल तिमिरा ॥२॥चा.॥

न्यायीकि हा अन्याय पहावा, स्वमानसिं हा ममकांता ॥
कपिलमूनीच्या वरप्रसादें, सर्व सिद्धि भावें नमितां ॥ चाल ॥
मामंजींचें मान्यकरा वचन ॥ सांगत्यें तुझाला सखया करजोडून ॥
अनेक रत्नें ते देतिल आणुन॥परोपरिनें विनवुनि साति ते मोहित नृपनाथा॥
कामि नाहीं या जगिं आपल्याला, हट्ट प्रियकरा कां धरितां ॥ १॥

गणासूर—

पद.

राग खमाज ताल रूप.

नकरीं खेद मनीं मृगनयनीं, प्राणप्रिये प्राणप्रिये गे ॥ धृ० ॥
स्वप्नांतिल गोष्ट सत्य, मानु नये ही असत्य॥
काळहि मज पाहुनि भीत, जोडुनि हस्त, शरण सयेगे ।
नकरीं खेद मनीं मृग नयनीं, प्राणप्रिये प्राणप्रियेगे ॥ १ ॥

( या प्रमाणें बोलत आहे इतक्यांत प्रधानादिक प्राप्त होऊन वंदने करितात. तेव्हां राणी अंतरगृहांत गमन करिते )

अभिजित—

आर्या.

स्वप्न भयंकर, शयनीं पडलें मज काळजी तमीं बुडवी ॥
माझे शिराशिं कोणी, अत्यद्भूत पुरुष परशुनें उडवी ॥ १ ॥

ग्रंथ—

साकी.

परवस्तू अभिलाष, निंद्य हा, ब्रह्मद्वेष अनिवार ॥
कृतघ्नताही घातक समजा, बोलति वेदहिसार ॥
चिंतामणि हारिला ॥ विपरित गोष्ट गमे मजला ॥ १ ॥

गुणवान— पद.

( बा काय घालशिल संश्रतिचा पींगा० या चालीवर. )

देवहुतीच्या सुता कपिल मुनिला, क्षोभविलें हा अन्यायचि जहाला ॥
साठ सहस्त्र अजिंक सगरांला, जाळिले क्षणार्धे कोपुन नृपतीला ॥
सर्पमुखीं घातलें करा आपुल्या, कीं अग्न लाविला वाटे सदनाला ॥
तरि जाउनियां समजाउनि मुनिला, देऊनी मणीतो रक्षीं प्राणाला ॥ १ ॥

विश्वजीत—

साकी. ( चाल दुसरी. )

अधमचि मजला वाटति जनजे, निजस्वामी लघु ह्मणती ॥
धिक्क तयाचें जिणें भासतें अबला सम ते जगतीं ॥
समजुनि हेंचि मनीं, मारावा तो कपिलमुनी ॥ १ ॥

गुणवान—

साकी. ( चाल २ री. )

वदलों परिमी, तुमच्या चित्ता, बरवें तेंचि कराहो ॥
माझें भाषण मजपाशीं तें, जाहलें सर्वहि राहो ॥
देव द्विज स्थानीं, क्रोध नसावा श्रुतिवाणी ॥ १ ॥

विश्वजीत— पद.

राग भूपकल्याण ताल धुमाळी.

( हरहर शिव शिव काय विषय हा देव पुजा करिता० या चालीवर. )

ऐकावें महाराज स्वामियां, प्रौढप्रतापी सुरवीरा ॥
अखंड विजयी सदां यश तुझें, प्रकाशलें कीं रणधीरा ॥ १ ॥
दिनमापि रजनीं धाक वहाती, शत्रु तुझे नित्याहि समरा ॥
तवबल सूर्य करा सम नाशी, रणांगणीं रिपुबल तिमिरा ॥ २ ॥ चा. ॥

सिद्ध असे हा दास तुझे सेवनां ॥ द्यावी आज्ञा काय असे ती दिना,
सामर्थ्यानें काळ करिन बंधना ॥
चिंता हरण्या उपाय उत्तम नसे यापरि दुसरा ॥
अखंड विजयी सदां यश तुझें, प्रकाशलें कीं रणधीरा ॥ १ ॥

अभिजित— पद. ( अंजनीगीत. )

( लंकेहूनी अयोध्ये जातां रामलक्ष्मण० या चालीवर. )

विनाशकालीं मति विपरित, वाक्य असे हें जनिं विख्यात ॥
समजुनि ऐसें कां विपरित, करिशी ममपुत्रा ॥ १ ॥
ब्रह्मशाप अतिउग्र भयंकर, साधू छळितां नाशचि सत्वर ॥
होईल यास्तव करूनि विचार, त्यजिं आग्रह मनिंचा ॥ २ ॥
शरण रिघावें कपिलमुनींला, देउनि तोषविं चिंतामणिला ॥
धन्यजगीं बा ह्मणतिल तुजला, सत्यवचन माझें ॥ ३ ॥

गणासूर— आर्या.

सर्वांहुनि मज गमला, विश्वजिताचा विचार हा बरवा ॥
मारावा कपिलमूनी, काळाचीही नसे मला परवा ॥ १ ॥

विश्वजीत सेना०—

कामदावृत्त.

जाउनी त्वरें कानना प्रती; वधुनि टाकितों कपिल दुर्मती ॥
साह्यकारि जरी त्यास हरिस्वयें, जिंकिन तया लागिं निश्चयें ॥ १ ॥

सूत्रधार— आर्या.

ईर्षा गणाशिं यावी, ऐसें हितमित वदोनियां सुघड ॥
समरा काढि कराया, गर्वें करुनी अकीर्तितें उघड ॥ १ ॥

### साकी.

गणासुराचे वीर तेधवां गजरथ भारां सहित ॥
विश्वजिताची आज्ञा मानुनि, सत्वरी जवळी येत ॥
सांगे गण त्यांला, जाउनि मारावें मुनिला ॥ १ ॥

(या प्रमाणें आज्ञा करून अरण्यांत जाण्याची सिद्धता करितात.)

---

## प्रवेश १३ वा.

---

स्थल.—अरण्य, तपोवन, कपिलाश्रम.

पात्रें.—गणासूर, ग्रंथ, गुणवान, विश्वजीत, प्रमथ, अष्टप्रधान, सुलभ, व शूलपाणीं ( गणासुराचे पुत्र ) आणि गणपती, सिद्धि, बुद्धी, कपिलमुनी. लक्षवीर, शिष्य आदिकरून.

सूत्रधार—

### कटाव.

गणासूरतो अभिजित नंदन, निघे सत्वरी रथीं बैसुन, महावीरातें सवें घेउन, चाले मुनिचा आश्रम लक्षुन, पुढें चालती चार प्रधान, गज वाजी रथ अपार सैन्य, तासे वाजंत्री बहुढोल, वाजति रण कर्कश बहुघोळ, पायदळाचे वीर प्रबळ, दक्षिण पश्चिम उत्तर भागीं, चाल करीती जागो जागीं, तमाम सेना धावें मार्गीं॥ यापरी त्या विश्वजिताचें, चाललें सैन्य निकराचें.

( गणासूर सर्व सेनेसह प्रवेश करतो. )

शिष्य—( धांवत येऊन, मुनीस )

कामदावृत्त

काय पाहतां कपिल महामुनी; दैत्य पातले बहुत या वनीं ॥
उपवनासिया वेष्टिलें पहा; असंख्य येतसे सैन्यभार हा ॥ १ ॥

( याप्रमाणें ऐकून त्या श्री गणपतीला मुनी ह्मणतो. )

कपिल— साकी.

हे जगदीशा भक्त पालका, संरक्षीं दासाला ॥
मारुनि रिपुला समरभुमीशीं दूर करी चिंतेला ॥
खल जन मदहरणा, धावें आतां तूं गजवदना ॥ १ ॥

सिद्धि—( गणपती पुढें उभी राहून )

पद.

( रामाशीं अनुकुल असतील त्यांचे० या चा० )

मारीन दैत्याशीं आज रणांत, दावीन तीही लोकीं पुरुषार्थ ॥
आणीन जीताचि मांत्रि धरूनी, संव्हारीन सर्व दैत्य वाहिनी ॥
व्याघ्री जैसी पाहे वनिं जंबुकाला ॥ त्याचपरी मारीं मीं असुरांला ॥

गणपती—

अभंग.

जाउनियां वेगें मारीं दैत्य सेना, स्त्री युद्धकंदना पाहूं आजी ॥ १ ॥
वधुनये गणासुराशी सुंदरी, अमुचिया करीं मृत्यु त्याचा ॥ २ ॥

( नंतर सिद्धी श्री गणपतीस नमस्कार करते. )

सूत्रधार—

कटाव.

सिद्ध जाहली वस्त्राभरणीं, कोमल वपु ते नयनें हरिणीं, आंगिं सुदीप्ती कांचन वर्णी, कर्णि ताटकें कीं शशितरणीं, चपल गतीनें चाले धरणीं, चरणिं नेपुर करिति रुणझुण, दिव्य जोडवीं वाजति खणखण, क्षुद्रघंटिका शोभति तैशा, दिव्य नभींच्या तारा जैशा, बाजुबंद कटिबंद झळकती, मौक्तिकमाळा सुढाळ रुळती, लखलख करिती कांठिं भूषणें, हिरे माणिकें, जडाव गहिंनें, शर चर्मक करिं शस्त्रें घेतलीं, भरजरी शालू दिव्य नेसली; लगबग तेथुनि त्वरित निघाली, शत्रू सैन्या निकट पातली ॥ यापरि ते ब्रह्म दुहिता, समर भुमी ये तत्वतां.

( या प्रमाणें दैत्यकटका निकट येऊन शरांचा वर्षाव करून सैन्य मागें हटविते. )

सुलभ— ( आश्चर्यानें )

साकी.

मृगनयना तूं सांग कुणाची, कां आलिस या ठायीं ॥
दया येतसे पाहुनि तुजला, येथुन सुंदरी जाई ॥
रण वीर पुरुषांचें, कर्म नव्हे हें अबलांचें ॥ १ ॥

सिद्धी—

कामदावृत्त.

दुष्ट दूर्मती, खलशिरोमणी, वधिन सकाळिकां आज या रणीं ॥
कपिल मुनीचिया रक्षणार्थ मी, पातलें जया कालही नमी ॥१॥

सूत्रधार— श्लोक.

( भुजंगप्रयात. )

अशी बोलुनि शत्रुला उग्र वाणी, बहू मारिले कोपुनीं तीव्र बाणीं ॥
फिरोनी पुन्हा भार शत्रू जनांचा, करीती बहू मार, तेव्हां शरांचा ॥१॥

## ओवी.

सिद्धी जाणूनी बलाद्भुत ॥ दानव धांवले असंख्यात ॥
ह्मणती एकली मारा त्वरित ॥ तंव अघटीत पाहिलें ॥ १ ॥

## पद.

( मग सिद्ध इंद्रजीत, त्वेरें येऊनी रणांत० या चालीवर )

पाहूनियां सैन्य फार, सिद्धि कोपे अनिवार ॥
रणीं दीसे भयंकर, दैत्य नायकां ॥ १ ॥
शत्रुवरी चालून, करी बाणांचा पर्जन्य ॥
विस्मित मनीं गण, सैन्य जहालें ॥ २ ॥
माया दावी अनिवार, निर्मी सैन्य ते अपार ॥
दैत्यांहुनी अती उग्र, भयंकर तें ॥ ३ ॥
युद्ध झालें घोरांधर, प्राण घेती परस्पर ॥
शस्त्रें अस्त्रें आनिवार, तेव्हां सूटती ॥ ४ ॥
पंचक राशीं गुणवान, चतुरंघ्रिशीं प्रधान ॥
विश्वजीत ज्याचें नाम, क्रोधि बहू तो ५ ॥
त्र्यक्ष ग्रंथ युद्ध थोर, शस्त्रें वर्षती अपार ॥
षडद ग्रंथ भयंफर, रणीं गर्जती ॥ ६ ॥
द्वादश मुखाशीं शूलपाणी, जूजे अती निरवाणी ॥
सुलभ सिद्धीसवें रणीं, उभा ठाकला ॥ ७ ॥

श्लोक. (मालिनी.)

उभयदळ मिळालें, कंदना घोर घायीं ॥
धडकति रणवाद्यें, नाद व्योमीं न मायीं ॥
धडधड रथ नेटें कंप तेव्हां क्षितीला ॥
उरगपति मनीं तो मानि मोठ्या भितीला ॥ १ ॥

दिंडी.

युद्ध झालें बहु घोर घडी चारी ॥ नये कोणी कोणास येकहारी ॥
अती क्रोधें ते दैत्य वीर धाई ॥ उठावले एकदां सर्व पाही ॥ १ ॥

आर्या.

तीव्र प्रखर सुलभ शरें, सिद्धी मूर्छीत तेधवां पडली ॥
सावध होउनि सत्वरी, सक्रोधें काय बोलती झाली ॥ १ ॥

आर्या.

सिद्धि—
तव असु हरशर माझे, साहे उभा, प्राण वांचवी राहे ॥
करिशी अर्भक चेष्टा, न सहें परि मज कदापि वीरा हे ॥१॥
ये पुत्रा बा सत्वरि, समरभुमी, साह्य आज करण्यातें ॥
वरण्या सत्कीर्ति जनीं, कपिलमुनी शत्रु प्राण हरण्यातें ॥

(इतक्यांत)

पद.

सूत्र०—
(एक आचमन करुनि आटवी सप्त सिंधूला० या चालीवर.)

ऐसें वचन ऐकतां मग समर भूमीशीं ॥
प्रगट होउनि लक्ष वीर तो वंदि मातेशीं ॥
लक्षकर विक्राळ भयासूर भ्रमावि शत्रूशीं ॥
कोणता ह्मणे दावि अरि तो मारिन दुष्टाशीं ॥ १ ॥

ग्रंथ संग्रहालय

सूत्र०—

## पद.

( मग सिद्ध इंद्रजीत० या चालीवर )

सुलभ आणि शूलपाणी, आले लक्षावरि धांउनी ॥
अग्नी अस्त्रातें प्रेरुनी, जाळिती सेना ॥ १ ॥
थोर मांडला आकांत, दग्ध सिद्धी बल होत ॥
पर्जन्यास्त्रातें सोडित, लक्षवीर तो ॥ २ ॥
सुलभें योजीलें वातास्त्र, लक्षें निर्मिले पर्वत ॥
दैत्य वज्रास्त्र टाकीत, पर्वतांवरी ॥ ३ ॥
परस्परें बाण जाळ, घालुनि झांकीलें निराळ ॥
रणांगणीं प्रळय काळ, भासला तेव्हां ॥ ४ ॥

## आर्या.

मग लक्ष वीर कोपुनि, अघटित करितांचि जाहला करणी ॥
गगनीं उडोनि वेगें, धरियेला दैत्य सुलभ तो चरणीं ॥ १ ॥

## कटाव.

सुलभ रथासीं त्वरें बांधिला, शूलपाणि ही तेव्हां धरिला, विश्वजितांशीं रणीं जिंकिला, सिद्धिसुतानें अनर्थ केला, दानव कटकीं कंप सूटला, ह्मणती काळच कोठुनि आला, कितीएक ते वनीं पळाले, कोणी प्रेतामध्यें दडाले, कोणी रिपुला शरण रिघाले, शस्त्रें टाकुनि पदीं लागले, कितीक नगराकडे धांवले, सिद्धि सैन्य मग पाठि लागलें, ॥ या परि त्या समरभुमीशीं, जय आला सिद्धिसुताशीं ॥ १ ॥

## आर्या.

हतगर्व विश्वजित तो, पळता जहालाचि काढुनी अंग ॥
भयभीत मुख पाहुनि गण, वृत्त ह्मणें काय जाहलें सांग ॥ १ ॥

**घायाळदूत**—(धांवत येऊन ) महाराज—

कामदावृत्त.

दश दिशा भयें, पळति विरमणीं; नाश पावले बहु रणांगणीं ॥
पातला महा वीर तो अरी, घेउनी पळा प्राण सत्वरीं ॥ १ ॥

**सूत्र.**—

कटाव.

क्रोध पावुनी गरगर नयनां, फिरवी रगडित करकर दशनां, गात्रें प्रचंड कांपति थरथर, दड दड चाले रागें भूवर, त्वरें येउनी निकट आश्रमा, रागें पाहे ऋषी सत्तमा, श्री बुद्धि ज्यां दक्षणभागीं, लक्षपुढें सिद्धि वामांगीं, सिंव्हावरि तो विभू पाहुनी, बोले रागें ऋषी लागुनी ॥ यापरी तो दानव वीर, ये आश्रमिं अति सत्वर ॥ १ ॥

**गणासूर**—( कपिलमुनीस अनुलक्षून )

पद.

( रामाशीं अनुकूल असतील०या चालीवर )

भस्म लावीलेंशी, सर्व शरीरा ॥
परि नाहीं लोभ मनांतील गेला ॥
अद्भूत पुरुष हा कोठुनी आला ॥
येथें कशास्तव सांग तूं मजला ॥ १ ॥

**कपिलमुनी**—

साकी.

दुष्टा नष्टा खलाधमा त्वां, त्रास दिला मज म्हणुनी ॥
तव नाशास्तव शरण रिघालों, या प्रभुच्या शुभ चरणीं ॥
परिसें वचनाला, मृत्यू काळ तुझा आला ॥ १ ॥

सूत्रधार— पद.

( मग सिद्ध ईंद्रजीत० या चालीवर. )

ऐसें ऐकुनी उत्तर, दैत्य कोपे अनीवार ॥
सोडीतसे पंचशर, गणतीवरी ॥ १ ॥
दोन बाण व्यर्थ गेले, तीन हृदयीं भेदले ॥
प्रभू मूर्छीत जहाले, नेत्र झांकुनी ॥ २ ॥
सावध होऊनी सत्वर, परशु सोडी अनीवार ॥
पाहुनियां गणासूर, भ्रमीत झाला ॥ ३ ॥
विद्युल्लतेचिये परी, परशु आला दैत्यावरी ॥
शीर उडवी गगनोदरीं, कंदुकासम ॥ ४ ॥
जयजयकारे सूरवर, पुष्पें वर्षती अपार ॥
नभीं विमानें सुंदर, दाटी जहाली ॥ ५ ॥
दैत्य प्रेत भयंकर, पडे आश्रमा बाहेर ॥
उचलूनीया सत्वर, नेती नगरातें ॥ ६ ॥

आर्या

दुःख ग्रस्ताचि आला, अभिजित चिंतामणीस घेऊन ॥
वंदी विभु चरणातें, शरण म्हणे दास मी तुझा दीन ॥ १ ॥

अभिजित-- पद.

राग बिभास

( उठिं प्रभाता सुमर लियो श्रीगणेश० या चा० )

गजानना दया निधे, प्रभो सिद्धि कांता ॥
सुर मुनिवर वेद वंद्य, शरण तुला ताता ॥ १ ॥
असुनि तुझे अंश जीव, भ्रम पावति देवा ॥
निजकर्मे भोगिति ते, करुनि स्वमनिं हेवा ॥ २ ॥

घेउनि हा चिंतामणी, रक्षि दिनानाथा ॥
करुनि दया द्यावें राज्य मम पौत्रा आतां ॥ ३ ॥
हरुनियां दुःखभया देशी सौख्य भक्तां ॥
दीनबंधु ब्रीद करीं सत्य तूं समर्था ॥ गजानना० ॥ ४ ॥

( याप्रमाणें बोलून चिंतामणी श्रीगणपतीचे स्वाधीन करितो. )

गणपती— पद.

( राग कालंगडा ताल धुमाळी )

भक्ति ज्ञान समभूषण दुसरें, कांहीं जनाला नसे ॥
धन्य तो ज्याच्या मनिं हें वसे ॥ १ ॥
सर्व सुखाचें मूळ सत्य हें, समजे जो अंतरा ॥
जन्मला धन्य जगीं तो खरा ॥ २ ॥
जावें नगरा अभिजित राजा, घेउनियां कूमरा ॥
करावें राज्य सुखें नरविरा ॥ ३ ॥
तव पुत्राला दिधली मुक्ती, शोक त्यजी सुंदरा ॥
अशाश्वत सर्व जाण प्रियकरा ॥ ४ ॥

सूत्रधार— आर्या.

प्रभुकपिलासि ह्मणें घे, चिंतामणि हा दिला असे तूतें ॥
मुनिवर वदे प्रभो घे, तूंचि मणि रक्षि दीन दासातें ॥ १ ॥
झाली तेव्हां पासुनि, चिंतामणि, कपिल, सुमुख अभिधानें ॥
प्रभुची उदारताही, पाहुनि जन गाति सुस्वरें गानें ॥ २ ॥

श्लोक.

दर्शनार्थ येति सर्व. विप्र त्या वनांतरीं ॥
विमान पंक्ति दाटल्या, समस्त देव अंबरीं ॥
करें करूनि पुष्पवृष्टि, धन्य धन्य बोलती ॥
अशा सुरांगनादि नारि हर्ष चित्तिं पावती ॥ १ ॥

( याप्रमाणें श्रीगणपती चिंतामणीअवतार पूर्ण करून परिवारासह निजधामाप्रत पावतात.)

सूत्रधार—

पद. ( भरतवाक्य )

दादरा

जगदीश्वर आदिनाथ ॥ दीनबंधु कृपावंत ॥
तुज आह्मीं शरण तात ॥ हात जोडितो प्रभो ॥ १ ॥
रिद्धि सिद्धि प्रीय कांत ॥ शंकर सुत महा समर्थ ॥
शेष वासुकी अनंत ॥ वर्णिती परोपरी ॥ २ ॥
तव लीला सुरस फार ॥ यक्षपती सुर मुनीवर ॥
देव अंगना मधुर ॥ गुण गाति सुस्वरीं ॥ ३ ॥
केशव सुत कवि गोपाळ ॥ शरण पदीं ठेउनि भाळ ॥
दास जनावरि कृपाळ ॥ होई तूं अहिर्निशीं ॥ ४ ॥
तवकृपें करुनि आज ॥ ग्रंथ पूर्ण महाराज ॥
जाहाला हें दास काज ॥ करुनि लाज राखिली ॥ ५ ॥
वंदुनियां देव संत ॥ सद्गुरु तो श्री अनंत ॥
आर्यजना विनति सत्य ॥ प्रीति सर्वदां असो ॥ ६ ॥

समाप्त.